MAHMARI 19358/13/1/2000 - TC




# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष तेरावे / अंक १ / जानेवारी २०१२

## संपादकीय

## भयावह प्रश्नांचे शतक

नागरीकरणाचे अनियंत्रित केंद्रीकरण चालू असलेल्या आपल्या देशात मोठमोठाली मानण्यात येणारी शहरे गावे या सर्वांसह टोकाला असणाऱ्या मानवी वस्त्यादेखील विचित्रपणाने एकरूप होत चालल्या आहेत. पूर्वी मुंबई, मुंबईची खेडेवजा असणारी उपनगरे, पुणे, पिंपरी, चिंचवड अशी स्वत:ची नावापुरती का होईना ओळख जपणारी गावे नकाशात दाखवता येत. आज यांच्या सीमा इतक्या वेगाने एकमेकींमध्ये अडकत चालल्या आहेत की या शहरांची, गावांची ओळख नावापुरतीच वेगळी उरत चालली आहे. जग जवळ येत आहे, इंटरनेटने व संगणकाने क्रांती केली असे म्हणता म्हणता जागतिक खेड्याच्या सर्वच सीमा अशा एकमेकींमध्ये हरवून चालल्या आहेत.

या सर्वांचा परिणाम अनेक प्रश्न निर्माण होण्यात होत चालला आहे. किंबहुना २१ वे शतक हे भयावह प्रश्नांचे शतक ठरणार की काय असे समाजशास्त्रज्ञांना वाटू लागले आहे. लोकवस्ती व लोकसंख्या हे प्रश्न या सर्वांच्या मुळाशी तर आहेतच; पण न संपणारी हाव आणि सुखाच्या विकृत होत जाणाऱ्या संकल्पना यांनी फक्त वाटोळे होण्याचे शिल्लक आहे. प्रदूषणाच्या सर्व प्रकारांनी टोक गाठले आहे. कचऱ्याचा प्रश्न 'आदर्श' असल्याचा पुरस्कार स्वीकारणाऱ्या नगरपालिका महानगरपालिकाही सोडवू शकत नाहीत. आवाजाचा इतका कल्लोळ कानाकोपऱ्यात आहे की माणसाचे कान आणि त्यांची श्रवणशक्ती टिकून आहे हेच नवल! जलप्रदूषणाबद्दल न बोललेले बरे! दारुच्या कंपन्या पाण्याच्या बाटल्यांच्या बेछूट जाहिराती करतात, त्याचवेळी अशाच एका बाटलीत पाल निघाल्याची बातमी हातातील वृत्तपत्रातून आपल्याला खुणवत असते. गांधीवादाचा आणि गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा उठल्या बसल्या जप करणाऱ्या आजच्या राज्यकर्त्यांनी कोणतीही नीती पाळायची नाही अशी शपथच घेतली आहे. सत्ता स्पर्धेतील चौफेर उधळलेले हे घोडे जी शर्यंत जिंकू पाहात आहेत ती शर्यत सामान्य माणसाचे जगणे उधळून लावत आहे. भ्रष्टाचार हा राष्ट्रीय स्तरावर चर्चिला जावा एवढ्या वेगाने वाढत चालला आहे.

नीती, आचार धर्म, धर्म संकल्पना या सर्वांच्या स्खलनामुळे 'वैध' आणि 'अवैध' या संकल्पनाच संपत चालल्या आहेत.

(मलपृष्ठ २ वर)

(मुखपृष्ठावरून )

**संपादकीय**

ध्वनी प्रदूषण हा एकच विषय घेतला तर आंतरराष्ट्रीय संघटनेने ध्वनीची घालून दिलेली मर्यादा कोणी लक्षातही घेण्याच्या मनस्थितीत नाही. शाळा, महाविद्यालये, इस्पितळे ही सर्व शांतता क्षेत्रात असावीत. असा कोपरा आजच्या समाज रचनेत शिल्लक नाही. शिवाजी पार्क सारखे मैदान, तेथील शक्ती प्रदर्शन करणारी भाषणे भर चौकात चाललेल्या दांडिया कृष्णाष्टमी यांसारख्या उत्सवांमध्ये जी उत्सवप्रियता बघायला मिळते तिने थरकाप उडतो. विकृत उत्सव प्रियतेतून स्वत:ची पाठ थोपटत रहाणारे तथाकथित नेते व त्यांचे कार्यकर्ते, स्वत:लाच ओवाळून घेणारे वाढदिवस वीर हे वातावरण आणखीनच गढूळ करत आहेत.

झपाट्याने जवळ आलेल्या या जगामध्ये प्रत्येकाचे हेतू आणि वास्तव बदलले आहे. त्यामुळे माणसे जवळ आली पण मने दुरावली अशी भयानक स्थिती निर्माण व्हायला लागली आहे. या सर्वांवर कोणीही नियंत्रण ठेवू शकत नाही ही आणखी एक शोकांतिका आजच्या या अराजक सदृश परिस्थितीत उद्या काही नवे निर्माण होईल याची शक्यता नाही. कारण रचनात्मक कार्यापासून आम्ही दूर चाललो आहोत. कोणताही अध्यात्मिक गुरू, उपोषण करणारे कोणतेही 'जनतेचे नेते' जादूची काडी फिरवून हा देश सुधारून दाखवू शकणार नाहीत. असे असले तरी मानवी मनातील आशेचा तंतू हा अखेर पर्यंत जिवंत असतो. शिक्षण घेतलेले काही तरुण जर एकत्र आले आणि त्यांनी काही सकारात्मक घडवून दाखवले तरच परीस्थिती बदलू शकेल. पण त्यासाठी जबरदस्त इच्छाशक्ती हवी आणि सामाजिक शिस्त हवी.

●●●

## पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वागयज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।। १ ।।

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।२ ।।

दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो । जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळमंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।

चलां कल्पतरुं चे आरव । चेतना चिन्तामणीचें गांव । बोलते जे आर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुखी । अखंडीत ।।७ ।।

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकी इये । दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।। ८ ।।

येथ म्हणें श्रीविश्वेशरावों । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।। ९ ।।

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष तेरावे / अंक ७ / जानेवारी २०१२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक ७ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | होहोट शहरातील डाझो मंदिराला भेट | - डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| २) | माधवराव गोखले - मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अध्यक्ष | - स्नेहांकित | ६ |
| ३) | संत गाडगे महाराजांच्या सान्निध्यात काही काळ- एक आठवण | - श्री. मा.ना. पाटील | ८ |
| ४) | स्वामी रामतीर्थ | - श्री. शं. बा. मठ | १० |
| ५) | ग्रंथालयाच्या वर्गीकरणाची तात्त्विक बाजू स्पष्ट करणारे पुस्तक | - स्नेहांकित | १४ |
| ६) | कृष्णाष्टकम् | - नीलकण्ठसुत | १६ |
| ७) | साहित्य- जगत | - श्री. शरद जोशी | १९ |
| ८) | भारतीय संस्कृती - बीज मॉडेल व साधना | - श्री. यशवंत साने | २१ |
| ९) | भक्तीचे प्रकार | - श्री. यशवंत माने | ३० |
| १०) | परिसर वार्ता | - संकलित | ३२ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर<br>कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२<br>या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# होहोट शहरातील डाझो मंदिराला भेट

*होहोटमधील वस्तुसंग्रहालयानंतर डाझो मंदिराचे वर्णन या लेखात डॉ. आगरकर यांच्या खास शैलीत वाचकांना सादर करत आहोत. - संपादक*

ऑगस्ट २०११ च्या पहिल्या आठवड्यात होहोटला जाण्याचा योग आला. तेथे किशोरवयीन मुलांसाठी नवनिर्मिती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ठाण्याच्या ए.के. जोशी शाळेतील विज्ञान प्रकल्प घेऊन शाळेतील तीन विद्यार्थी, एक शिक्षिका आणि विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्यासमवेत २ ऑगस्ट रोजी होहोटला पोहचलो. दुसऱ्या दिवशी प्रयोग लावण्याचे काम होते. ते अर्ध्या दिवसातच संपले. त्यामुळे उरलेला अर्धा दिवस प्रेक्षणीय स्थळांना भेटी देण्याची योजना आयोजकांनी आखली होती. त्यानुसार जेवणानंतर आपल्याला एका मंदिरात जायचे आहे असे आम्हांला सांगण्यात आले होते. प्रवासाला सोयीचे व्हावे यासाठी आंतरराष्ट्रीय सभासदांकरिता दोन वेगळ्या बसेसची सोय केली होती. त्यांतील एका बसमध्ये आम्ही स्थानापन्न झालो. तरी बस सुटेना. चौकशीअंती असे कळले की बस चालक पोलिस वाहनाच्या निघण्याची वाट पाहात आहे. आंतरराष्ट्रीय सभासदांच्या सोयीसाठी हे पोलिस संरक्षण दिलेले होते. पुढे पोलिसची गाडी आणि तिच्यामगे आमच्या दोन बसेस असा आमचा प्रवास सुरू झाला. पोलिसांची गाडी पुढे असल्याने सर्व चौकात इतर बाजूंची वाहने थांबवून आम्हांला जायला सांगण्यात येत असे. त्यामुळे अर्ध्या तासात आम्ही डाझो मंदिराजवळ जाऊन पोहोचलो. इमारतीच्या विशिष्ट बांधणी आणि रंगावरूनच आपण प्रेक्षणीय स्थळावर आल्याचे लक्षात येते. आजूबाजूला लोकवस्ती आहे. तरीही मंदीराजवळ भरपूर मोकळी जागा ठेवलेली आहे. गाड्या उभ्या ठेवण्यासाठी पुरेशी जागा आहे. मंदिराचे प्रवेशद्वार आपले स्वागत करते असेच ते दृश्य आहे.



**मंदिराचे प्रवेशद्वार**

डाझो हे बुद्धाचे मंदिर असून तेथे बौद्धभिक्षुकांची राहण्याची व्यवस्था आहे. मिंग राजवटीत १५८० या वर्षी हे मंदिर बाधून झाले. या मंदिराच्या बांधकामावर तिबेट वास्तुशास्त्राचा प्रभाव असल्याचे स्पष्ट होते. मंदिर पूर्ण झाल्यावर केवळ ७ वर्षांनीच म्हणजे १५८६ मध्ये तिबेटचा तिसरा दलाई लामा यांनी येथे भेट दिली होती. तेव्हापासून मंगोल लोकांचे हे एक श्रद्धास्थानच झालेले आहे. मोठ्या संख्येने बौद्ध वंशाचे मंगोल भक्त दरवर्षी येतात.



**घोड्याच्या पुतळ्याची पूजा**

भव्य प्रवेशद्वारातून आपण आत जातो तेव्हा मंदिराचे तीन भाग पडल्याचे आपल्या लक्षात येते. पहिला भाग म्हणजे पहिली इमारत; तशी मोकळीच आहे. तेथे मोठा हॉल आहे. मोठ्या प्रमाणात लोक आले की त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी या हॉलचा उपयोग करीत असावेत. ही इमारत पाहून आपण पुढे जातो तर आपल्याला ध्यान करण्यासाठी बांधलेला हॉल दिसतो. या परिसरात लामा तसेच बौध भिक्षुक राहतात. त्यांना ध्यान करायला सोयीचे व्हावे यासाठी या हॉलची निर्मिती केलेली आहे. ते ओलांडून आपण पुढे जातो तर तिसरी इमारत नजरेस पडते. या इमारतीत एक अतिशय प्रचंड अशी मूर्ती आहे. ती चांदीची असून तिची उंची सुमारे अडीच मीटर आहे. ती सुक्यमुनीची मूर्ती असल्याचे आमच्या मार्गदर्शकाने आम्हांला सागितले. चांदीच्या या भव्य मूर्तीमुळे या मंदिराला चांदीचे मंदिर असे म्हणून देखील संबोधण्यात येते. या चांदीच्या मूर्तीचे फोटो काढण्यास मनाई आहे. त्यामुळे आमची निराशा झाली. परंतु आम्ही परिसरातील इतर इमारतींचे आणि पुतळ्यांचे अनेक फोटो घेतले.



**मंदिराची इमारत**

एका इमारतीत सुंदर चित्र काढलेले आहे. काही उपदेशपर जातक कथा तेथे चितारलेल्या आहेत. त्या कथा ऐकण्याची आम्हांला उत्सुकता होती. परंतु एकतर मार्गदर्शिकेचे इंग्रजी आम्हांला बरोबर समजत नव्हते. दुसरे असे की, आमच्या इतर सहकाऱ्यांना लवकर पुढे जायचे होते. म्हणून कुतूहल मनात ठेऊन आम्ही पुढे निघालो. परंतु तेव्हढ्यात तेथील चित्रांचे फोटो मात्र घेतले. त्यांतीलच एक चित्र खाली दिलेले आहे.



**भिंतीवरील बोलकी चित्रे**

आजूबाजूला भिक्षुकांची राहाण्याची सोय आहे. त्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा येथे पुरविलेल्या आहेत. ध्यानासाठी स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे. या घरात देखील सुंदर सुंदर मूर्त्या आणि चित्रे आहेत. त्यांतील एका मूर्तीचे चित्र खाली दिलेले आहे.



**बाजूच्या इमारती मधील एक पुतळा**

मंदिराचा परिसर अतिशय स्वच्छ आहे. इतर बुद्ध मंदिरे असतात तसेच हे मंदिर रंगीबेरंगी आहे. तिबेटन बांधकामाच्या पद्धतीमुळे या सगळ्या इमारती नजरेत

भरतात. मंदिराच्या मोकळ्या जागेत सुंदर झाडे लावली आहेत. बोन्साय रूपातील ही झाडे आपले लक्ष वेधून घेतात. मंदिराच्या दोन्ही बाजूला बौद्धभिक्षुकांना राहण्यासाठी इमारती बांधलेल्या आहेत. सर्व वयाचे भिक्षुक आपल्याला येथे पाहायला मिळतात. मंदिराच्या परिसरातच काही दुकाने आहेत. भेटवस्तू घेण्यासाठी ही ठिकाणे चांगली आहेत. तेथून स्मरणासाठी एक वस्तू घेतली आणि मंदिराचा निरोप घेतला.



**मंदीरातील धातूचे मोठे भांडे**

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

●●●

## चुकीची दुरुस्ती

डिसेंबर २०११ मधील 'ग्रंथालय आधुनिकीकरण' या संदर्भातील लेखाचे लेखक प्रा. नारायन बारसे असे छापले गेले आहे ते कृपया प्रा. नारायण बारसे असे वाचावे.

– संपादक

॥ श्री गजानन जय गजानन॥

***मराठी* - *सुखदायक नवीन वर्ष***

***हिंदी* - *नया साल मुबारक हो ।***

***इंग्रजी* - A HAPPY NEW YEAR**

***संस्कृत - मंगलदायी नव संवतसरम्***

***बंगाली - सुखी नुतन जन्सरम्***

***तेलगु - जागा याडा या दिनम***

***सिंधी - न्यु सालज मुबारक***

***तामिळ - नललात होंडात दिनम्***

***कन्नड - शुभ होसा वरूस वागेला***

***पोर्तुगीज - आ पोलोस नोवा आनो***

***फ्रेंच - आ यु ह रेजो आ***

***इटालियन - फेर्लस न्युव्ह ला आनो***

***जर्मन - ग्लुक लीच न्यु जाहर***

***लॅटीन - जु आहस अनुरानो टुस***

***कच्छी - सुखी नुतन खास्सो डी.***

***गुजराथी - साल मुबारक***

***बंजरा - नव वर्षे तोनं हार्दिक शुभेच्छा***

***- विदुला वैद्य***
***डॉ. बेडेकर विद्या मंदिर***
***(संग्रहातून)***

# माधवराव गोखले - मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अध्यक्ष

*विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ कार्यकारिणी सदस्य व कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले यांची अलीकडेच ठाण्याच्या मराठी ग्रंथ संग्रहालयाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यासंदर्भात त्यांची मते जाणून घेण्याच्या दृष्टीने सदर संक्षिप्त लेख घेत आहोत - संपादक*

ठाणे भारत सहकारी बँक, श्रीकौपिनेश्वर न्यास, विद्या प्रसारक मंडळ अशा अनेक संस्थांमधे सातत्याने कार्यरत असणारे माधव यशवंत गोखले हे स्वत: एक संस्था बनले आहेत. सार्वजनिक जीवनातील त्यांचा अनुभव फार मोठा आहे. त्यामुळे अनेक प्रकारच्या स्वभावांची माणसे त्यांनी जवळून अभ्यासली आहेत.

श्री. मा. य. गोखले यांचा परिचय करून देण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयाचे ते अध्यक्ष झाले हे होय. ग्रंथालयाच्या २५ सप्टेंबर २०११ रोजी झालेल्या निवडणुकीत अध्यक्ष म्हणून श्री. मा. य. गोखले यांची बिनविरोध व एकमताने निवड झाली. गतवर्षी झालेल्या ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने श्री. गोखले यांचा ग्रंथ संग्रहालयाशी व संग्रहालयाचे कार्यकर्ते यांच्याशी विशेष संबंध आला. त्यामुळे संग्रहालयाच्या निवडणुकीत त्यांनी भाग घेतला व बिनविरोध निवडून आले. मा. श्री. गोखले साहेबांचा स्वभाव मनमिळाऊ असल्याने अनेक संस्थामध्ये ते सक्रिय आहेत. ज्या संस्थांच्या कार्यकारिणीवर ते आहेत त्यामुळे आपला स्वत:चा दर्जा काही वाढला आहे, असा अहंभाव त्यांच्या मनात कधीच नसतो. वयाची ८० वर्षे पूर्ण करीत असताना संग्रहालयाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी घेतली. पदाचा आब व मान कायम ठेवणारे श्री. गोखले यांना पदाचा मोह मुळीच नाही. त्या जागी कोणी तरुण उमेदवार आला तर ते जागा सोडण्यास तयार असतात. इतका स्वच्छ दृष्टिकोन असल्यामुळे आणि घेतलेल्या जबाबदारीत जीव ओतून काम करण्याच्या स्वभावामुळे त्यांचा संस्था संबंध मोठा झालेला आहे.



**श्री. मा. य. गोखले**

सर्वसामान्य प्रत्येक बाबीकडे विधायक दृष्टीने बघणारे श्री. गोखले आपल्या सार्वजनिक जीवनात तोल कधीच ढळू देत नाहीत. प्रसंगी अनेक कठोर निर्णय त्यांनी घेतलेले आहेत. प्रशासनातील शिस्त ही सर्वांनी पाळलीच पाहिजे याबाबत ते आग्रही असतात.

मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या प्रशासनात त्यांना अपेक्षित असणारी शिस्त आणण्याचा ते प्रामाणिक प्रयत्न करणार आहेत. या संस्थेच्या अध्यक्षांची परंपरा मोठी आहे. आपली कारकीर्द त्या परंपरेला न्याय देईल आणि आधुनिक काळाच्या संकल्पनांनुसार संस्थेला पुढे नेईल असा आत्मविश्वास त्यांच्या मनात आहे. कार्यकारणीतील २६ कार्यकर्त्यांबरोबर संस्था चालवताना आपण एकत्रितपणे व एकसंघ असे काम करावयाचे आहे असे मनोमन ते बाळगून आहेत.

२१ व्या शतकात सार्वजनिक ग्रंथालयांची कल्पना झपाट्याने बदलत चालली आहे. एकीकडे जुन्या परंपरा

जपायच्या आणि दुसरीकडे आधुनिक युगातील परंपरांशी जुळवून घ्यायचे असे कठीण काम संग्रहालयासारख्या संस्थांना करावे लागत आहे. माधवराव गोखले यांनी या सर्वांचा परिपूर्ण विचार केला आहे.

अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी मुख्य इमारतीतील सर्व दालने, खोल्या, विभाग यांची पहाणी केली. त्यांच्या कामकाजाचा आढावा घेतला. त्यांना जाणवलेल्या कमीजास्त बाबींबद्दल कार्यकारिणीतील सहकाऱ्यांशी त्यांनी चर्चा केली. संस्थेची घटना नीट अभ्यासली आणि सर्वच्यासर्व सदस्य बैठकीला यावेत यासाठी प्रयत्न केले.

मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सदस्यत्वांच्या प्रकारात ''संस्था सदस्य'' असा एक नवीन वर्ग करावा का याबद्दल त्यांचा विचार चालू आहे. मराठी ग्रंथसंग्रहालयातील कर्मचारी, कार्यवाह, कार्यकारिणीतील सदस्य यांच्या कार्यकक्षा निश्चित करण्याचा श्री. गोखले यांनी प्रयत्न सुरू केलेला आहे. संग्रहालयाचे उपक्रम, कार्यक्रम यांना प्रसिद्धी देण्याबाबत काही धोरण असावे असेही त्यांचे मत आहे.

अध्यक्ष व संस्थेचे इतर पदाधिकारी यांच्या बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करता येईल का, त्यासाठी आराखड्यात काय बदल शक्य आहेत याचा विचार ते करीत आहेत. ग्रंथालयाचे कार्यक्रम, देवाणघेवाण इतर विभाग आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे संगणकीकरण आणि इंटरनेटची व्यवस्था यांचा ते अभ्यास करीत आहेत. या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींचा सल्ला घेण्याचा त्यांचा मानस आहे. संगणकीकरण पूर्ण झाल्यानंतर दैनंदिन कामकाजासाठी संगणकाचे उपयोजन करता येईलच पण संकेत स्थळ कसे करावे, त्यात कोणते तपशील असावेत याबद्दलही त्यांचा अभ्यास चालू आहे.

ग्रंथालयातील लो. टिळकांचे तैलचित्र, साहित्य संमेलनातील अध्यक्षांची छायाचित्रे, ग्रंथालयाचे यापूर्वीचे अध्यक्ष व त्यांचे कार्यकाळ यांची यादी बनविणे या सर्व मुद्यांचा ते विचार करीत आहेत. गोखले साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू म्हणजे कोणताही पूर्वग्रह न बाळगता ते संस्थेसाठी काम करतात. हे करताना सहकाऱ्यांना बरोबर घेतात. मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या बाबतीत देखील त्यांचा असाच दृष्टिकोन आहे. इंग्रजीत ज्याला ''स्टेट ऑफ आर्ट'' म्हणतात. असे काळाशी सुसंगत व अद्ययावत ग्रंथालयाचे स्वप्न श्री. गोखले बाळगून आहेत.

या विषयाचा अभ्यासक म्हणून मी काही विचार त्यांना बोलून दाखविले . उदा ठाण्याची लोक संख्या लक्षात घेता दूरवर राहणाऱ्या वाचकांपर्यंत पोहचता यावे यासाठी फिरत्या ग्रंथालयाची गरज, स्थानिक इतिहास कोपरा या विभागाची ग्रंथालयाची गरज, संकेतस्थळाचे स्वरूप अशा अनेक बाबींवर गोखले साहेबांनी माझे विचार जाणून घेतले. आपल्याला काहीतरी करावयाचे आहे ते चांगले करावयाचे आहे आणि आपल्या संस्थेचे नाव नामांकित सार्वजनिक ग्रंथालयांच्या यादीत आणावयाचे आहे. अशी तळमळ गोखले साहेबांच्या बोलण्यातून स्पष्टपणे जाणवत होती. आधुनिक काळाशी सुसंगत राहण्याच्या दृष्टीने त्यांचे हे विचार अमलात यावेत व ग्रंथालयाचे नाव आधिक मोठे व्हावे ही सदिच्छा!

**– स्नेहांकित**

●●●

# संत गाडगे महाराजांच्या सान्निध्यात काही काळ - एक आठवण

*विद्या प्रसारक मंडळाच्या कार्य कारिणीचे ज्येष्ठ सभासद मान. मा.ना. पाटील यांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या शैलीतील एक लेख – संपादक*

महाराष्ट्रात अनेक साधूसंत होऊन गेले. त्यापैकी संत गाडगे महाराज होते. लोकांमध्ये धार्मिक जागृती, किर्तन, प्रवचन करणे तसेच स्वच्छता मोहीम राबवणे इत्यादी कार्य ते करीत असत. नासिकमध्ये गोदावरीच्या पश्चिम तीरी त्यांचा आश्रम व धर्मशाळा आहेत. गोदावरीच्या पश्चिम तीरी एक टेकडी व जो भाग होता तेथे आश्रमांत ते स्वत: रहात होते. तसेच लोकांसाठी व शिष्यांसाठी मोठ्या प्रमाणावर एक धर्मशाळा अजूनही आहे. महाराष्ट्रात इतरही काही ठिकाणी त्यांच्या धर्मशाळा आहेत. महाराष्ट्र सरकार त्यांची स्वच्छता मोहीम आजही राबवीत आहे.

नासिकमध्ये गंगातीरी एक घारपुरे घाट या नावाचा घाट आहे त्याला लागून बऱ्याच वस्त्या व वाड्या आहेत त्यापैकी एक आरबूज नावाच्या गृहस्थांची वाडी होती. त्या वाडीत माझे श्वशुर रहात होते. स्वत: आरबूज हे संत गाडगे महाराजांचे एक भक्त होते. १९५३ – ५४ मध्ये मी व माझी पत्नी मे–जूनमध्ये काही दिवस नासिकला जात असू. असेच एकदा आम्ही नासिकला श्वशुरांकडे गेलो तेव्हा आंब्याचे दिवस असल्यामुळे ठाण्याहून एक हापूस आंब्यांची पेटी घेऊन गेलो होतो.



**संत गाडगे महाराज**

एक दिवस सायंकाळी ८ च्या सुमारास वाड्यात संत गाडगे बाबा आले आहेत अशी बातमी समजली. श्री. आरबूजांना सर्वजण दामूशेठ म्हणून हाक मारीत असत. ते बाबांचे भक्त असल्यामुळे बाबा त्यांच्याकडे आले होते. श्री. गाडगे महाराज नेहमी एक पायघोळ जाड कापडाचा डगला घालीत व त्यांच्या जवळ एक मातीचे खापर कमंडलू सारखे डोक्यावर ठेवलेले असायचे. बाबा शक्य तो मोकळ्या जागेत बसत. जमिनीवर घोंगडी अंथरलेली असे त्यावर ते बसत कोणी खाण्यासाठी गोड धोड आणले तर ते परत करीत. फक्त भाजी भाकरी कटोऱ्यांत घेऊन खात असत.

माझ्या पत्नीने एका तबकात ५–६ आंबे घेतले आणि महाराजांच्या दर्शनासाठी खाली मैदानात बाबा विश्रांती घेत होते तेथे गेलो. इतरही काहीं मंडळी, लहान मुले भोवती बसलेली होती. आम्हांला समजले की महाराजांना बरे वाटत नाही आणि ते विश्रांती घेण्यासाठी आले आहेत. आम्ही महाराजांना नमस्कार करून त्यांच्या जवळ बसलो. पत्नीने आंब्याचे ताट

महाराजांना देत म्हटले बाबा मुंबईचे आंबे आहेत. आपण खावेत. महराज म्हणाले ''बाबाला गोड काही नको.'' मी थोडा आग्रह केला की बाबा आंबा हापूसाचा आहे थोडा तरी खा. त्रास होणार नाही. महाराजांनी ताटाला हात लावला आणि म्हणाले सगळ्यांना प्रसाद म्हणून वाटा. तेथे असलेल्या मंडळीला १-१ आंबा वाटून दिला. महाराज गप्पा मारत होते. चौकशी करीत होते. ''कुठून आलात? काय करता?'' इत्यादी. प्रत्येकाशी महाराज बोलत होते. काहीजण त्यांचे पाय चेपीत होते. थोडा वेळ बसून आम्ही जेवणासाठी घरी परतलो. जेवण केले आणि बोलत बसलो होतो.

रात्री १० च्या सुमारास वाडीत लोकांची पुन्हा गर्दी अंगणांत जमा झाली. काय झाले म्हणून चौकशी केली तेव्हां समजले की महाराज त्यांच्या आश्रमात जाण्यासाठी निघाले आहेत. पुन्हा महाराजांचे दर्शन घ्यावे म्हणून मी व पत्नी खाली आंगणात आलो. वाडीचे मालक श्री. दामू शेठ महाराजांशी बोलत होते. श्री. दामुशेठ महाराजांना रात्री मुक्काम करा उद्या सकाळी तुम्हांला सोडतो. महाराज काही ऐकेनात. मला आताच्या आता आश्रमांत सोड. श्री. दामूशेठचे नाशिकमध्ये अेक मोठे गॅरेज होते. तेथे ट्रकच्या बॉड्या बांधणे, गाड्या दुरुस्त करणे इत्यादी समे होत असत. तेथेच श्री. दामूशेठ त्यांची गाडी ठेवीत होते. महाराज काही केल्या ऐकेनात म्हणून श्री. दामूशेठ म्हणाले की १० मिनिटांत गाडी घेऊन येतो व तुम्हाला नेऊन सोडतो.

१० मिनिटानंतर श्री. दामुशेठ गाडी घेऊन आले. गाडी रस्त्यावर उभी केली आणि महाराजांना गाडीत बसण्यासाठी नेण्याकरिता वाडीत आले. महाराजांचे पाय दुखत होते. चालण्यास त्रास होत होता. श्री दामूशेठनी मला महाराजांच्या जवळ एका बाजूला येण्यास सांगितले. दुसऱ्या बाजूला श्री. दामूशेठ अुभे होते. महाराजांना आपण धरून गाडीत बसवू असे सांगून महाराजांना आधार देण्यास सांगितले. महाराजांनी माझ्या व श्री. दामूशेठच्या खांद्यावर त्यांचे हात टाकले आणि म्हणाले न्या आता मला पालखी करून. असे बोलून दोन्ही पाय उचलून घेतले आणि आमच्या खांद्यांचा आधार घेऊन पालखी केल.

थोडे अंतर गेल्यावर रस्त्यावर गाडी अुभी होती. तीमध्ये महाराजांना बसविले. गोदावरी नदीच्या तीरावर महाराजांची जागा आश्रमाच्या बाजूला आहे. थोडे वर चढून जावे लागते. महाराजांना गाडीतून बाहेर काढून चढण सुरू होते तेथपर्यंत आम्ही पुन्हा पालखी करून नेले चढण सुरू होते तेथे महाराजांनी पाय जमिनीवर टेकवले आणि खांद्यावरचे हात काढले. आणि म्हणाले तुम्ही आता परत जा. मी वरती चढून जातो. आम्ही म्हणालो की बाबा आपल्याला चालायला त्रास होतो आहे. आम्ही आपल्याला वर घरात नेऊन सोडतो. महाराज काही केल्या ऐकेनात. शेवटी बाबांनी आम्हांला दोघांनाही ढकलले आणि तुम्ही गाडीत जाऊन बसा आणि घरी जा. आम्ही गाडीत बसे पर्यंत महाराज अुभे राहून पहात होते. आमची गाडी सुरू झाली. आम्ही घरी आलो.

**श्री. मा.ना. पाटील**
ज्येष्ठ कार्यकारिणी सभासद,
वि.प्र.मंडळ, ठाणे

●●●

## २०१२ साठी सर्वांना हार्दीक शुभेच्छा !

– संपादक

# स्वामी रामतीर्थ

(लेख पहिला)

*श्री. शंकरराव मठ यांची नवीन लेखमालिका चालु करत आहे – संपादक*

भारताच्या इतिहासात अगदी अलीकडील श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वांत ठळकपणे ज्यांचे दर्शन घडते त्यामध्ये स्वामी रामतीर्थ एक आहेत. भारताच्या वायव्य कोपऱ्यात जन्मलेला हा शान्तिदूत जगाला शांतीचे अर्घ्य देत वयाच्या केवळ तेहतिसाव्या वर्षी चिरशान्तीचा स्वामी बनला. महाराष्ट्रात यांची ओळख इतकीशी झाली नाही याचे कारण असे असावे की त्यांचे बरेचसे लिखाण आणि काव्य उर्दू आणि पार्शियन मध्ये आहे. काही विद्वानांनी त्यांचा परिचय मराठी माणसाना करुन देण्याचा मौलिक प्रयत्न केला आहे.

**तत्कालीन परिस्थिती :**

भारत गुलामगिरीत खितपत होता. राज्यकर्ते ब्रिटिश होते. त्यांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे प्रभुत्व प्रस्थापित झाले होते. त्यामुळे अशिया व आफ्रिका खंडातील सामान्य, अशिक्षित आणि दरिद्री माणसात प्रचंड न्यूनगंड निर्माण झाला होता. अशावेळी हिंदुस्थानला समर्थ बनविण्याचे कार्य भारतीय संस्कृतीचे दोन प्रवक्ते स्वामी विवेकानन्द आणि स्वामी रामतीर्थ यानी केले.

भारतीय संस्कृतीत निसर्ग आणि माणूस या दोहोंतील एकात्मतेचा व अव्दैताचा पुरस्कार केला आहे. विधायकता, सहजीवन, सहिष्णुता हा भारतीय संस्कृतीचा मानदंड आहे. अद्वैत हे भारतीय माणसाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. अव्दैत वेदान्ताचे तत्त्वज्ञान उपनिषदात ग्रथित केले आहे. उपनिषदाचे उद्गाते प्रामुख्याने बहुजन समाजातीलच आहेत. राजा जनक, दलित गाडीवाला रैक्व, विदुषी मैत्रेयी अनौरस जाबालं यांच्या अलौकिक जीवन अनुभूतीचे संकलन आहे. विविधतेने नटलेले, नित्य नवीन रूप धारण करणारे जीवन हा उपनिषदांचा गाभा आहे. बदल हा माणसाचा स्थायी भाव आहे. हाच माणसाच्या सजीवतेचा अर्थ आहे. संस्कृती अशा लोकांना धारण करते आणि त्यांच्या जीवनाला गतिमान करून सुदृढ व्यक्तिमत्व बनविते.

**कार्य :**

स्वामी रामतीर्थ आणि स्वामी विवेकानन्द या उभयतांनी वेदान्ताला वैज्ञानिक निरूपण दिले. यासाठी अमेरिका ही प्रयोग भूमी म्हणून वापर केला. वेदान्त हे केवळ तत्त्वज्ञान नाही तर माणसाला स्वाभिमानी बनविण्याची साधना आहे. त्यामध्ये विविधतेतील एकात्मता, परिवर्तनशीलता, विधायकता, सहिष्णुता अशा अनेक गुणांचा समावेश आहे. आजच्या माणसाला प्रयोगक्षम 'वेदान्ताचे दर्शन' देण्याचे आधुनिक माणसाला वैज्ञानिक ज्ञानासाठी सज्ज करण्याचे कार्य स्वामी रामतीर्थांनी केले. त्यांच्या वेदान्ताचे स्वरूप सामान्य माणसाचे आहे. त्यांची साधना वैयक्तिक आणि स्वावलंबी आहे. आत्मनिष्ठ वेदान्ताचे निरूपण त्यांनी केले आहे. जीवनाला वर्तमानाचे परिणाम देणे आणि जीवनाला कालारूढ करणे हे त्यांच्या साधनेचे व्यावहारिक वेदान्ताचे स्वरूप आहे. वेदान्त म्हणजे कालबद्ध ऐहिक जीवनच. त्यांनी माणसाला समर्थ बनविण्यासाठी उद्‌बोधन केले आहे.

देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगाच्या जुटी ।
सर्व अर्पावे शेवटी । प्राण तोही वेचावा <u>(समर्थरामदास)</u>

पिता जर तुमच्या साक्षात्काराच्या आड येत असेल तर प्रल्हादाप्रमाणे त्याला तुम्ही सोडा, माता जर तुमच्या साक्षात्काराच्या आड येत असेल तर भरताप्रमाणे तिचा त्याग करा, सत्याच्या मार्गात जो पर्यंत तुमच्या आड कोणी येत नाही तो पर्यंत तुम्ही त्यांना मान द्या. बंधू तुमच्या आड येत असेल तर बिभीषणासारखे तुम्ही त्याला सोडा. पती तुमच्या आड येत असेल तर मीराबाई प्रमाणे त्याचा त्याग करा. गुरू तुमच्या आड येत असेल तर भीष्माप्रमाणे त्याचा त्याग करा. कारण तुमचा खरा आप्त खरा बंधू सत्य किंवा परमात्मा हाच आहे. बाकी सर्व नाती क्षणिक आहेत. सत्य किंवा परमात्मा, हेच काय ते खरे आणि शाश्वत नाते आहे. या करता सर्वापेक्षा सत्याला म्हणजे परमात्म्याला आधिक मान द्या.

''जेणे घडे नारायणी अंतराय। होय बाप माय वर्जावी ती।
यरे प्रिय पुत्रा धना कोण लेखा। करिती ती दु:खा पात्र शत्रू।
प्रल्हादे जनक बिभीषणे बंधू। राज्य माता निंदु भरते केली।
तुका म्हणे सर्वधर्म हरिचे पाय। आणि उपाय दु:ख मूळ।''

(श्री संत तुकाराम महाराज)

**जन्म व बालपण:**

शके १७९५ आश्विन वद्य अमावास्या बुधवार दि. २२ आक्टोबर १८७३ रोजी स्वामी रामतीर्थांचा पंजाब प्रांतात जन्म झाला. श्री हिराचन्द अत्यंत सालस वृत्तीचे नित्य उद्यमशील गृहस्थ होते. परंपरागत चाललेला उपाध्यायपणा ते चालवीत असत. ते अत्यंत प्रामाणिक म्हणून त्यांची कीर्ती मुरलीवाला व तसेच गुजराणवाला जिल्ह्यात पसरली. त्यांची धर्मपत्नी सोज्वळ असून नवऱ्याच्या मिळकतीत ती समाधानी होती. प्रभुचरणाचे स्मरण करीत हे कुटुंब समाधानाने नांदत होते हा त्यांचा साधा परमार्थ.

हिराचन्दाना गुरुदास नावाचा एकपुत्र होता. त्यांच्या घरी दुसरे अपत्य जन्माला आले. दिवाळीच्या आनंदात पुत्र लाभाची आनंदाची भर पडली. हिराचन्दांचे वडील रामचंद्र उत्तम ज्योतिषि होते. अमावास्येच्या दिवशी जन्मलेल्या आपल्या नातवाची त्याने कुंडली मांडली. मिश्रभाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटले. ते आपल्या मुलाला म्हणाले हिरा या कुंडलीचे भविष्य मोठे विलक्षण आहे. लौकिक दृष्ट्या कुंडली इतकी चांगली नाही. मात्र पारमार्थिक दृष्ट्या ही कुंडली खरोखरच अलौकिक आहे. हा मुलगा अल्पायुषी आहे. ३०/३५ वर्षापेक्षा या मुलाचे आधिक आयुष्य नाही. हा मुलगा खूप शिकेल, मातृसुखाचा वाटा कमी आहे. पारमार्थिक क्षेत्रात हा दिगंत कीर्तीचा होईल. अनेक राष्ट्रांत याचा संचार होईल. आयुष्याच्या अखेर हा संन्यास घेईल.

बाळाच्या नामकरणाचा विधी घरी साजरा झाला बाळाचे नाव तीर्थराम असे ठेविले. तीर्थराम वर्षाचे होण्यापूर्वीच त्याच्या मातेने इहलोकीची यात्रा संपवली. तीर्थरामाची आत्या धर्मकौर हिने मुलाना सांभाळले. ती स्वत: अत्यंत धार्मिक वृत्तीची होती. ती रोज मंदिरात जाई मुलाना भक्ति स्तोत्रे शिकवी. पुराणातील गोष्टी सांगे. मुलाकडून स्त्रोत्रे पाठ करून घेई तीर्थरामाला अवघ्या पाचव्या वर्षी अनेक स्तोत्रे पाठ झालेली होती. राम आत्याचा लाडका होता.

वजिराबाद तहसिलात वरौके नावाचे गाव आहे. तिथे पंडित रामचंद्र नावाचे एक सज्जन राहात होते हिराचंद घराण्याशी त्यांचा घरोबा होता. त्यांना एक मुलगी होती. तिचे नाव शिवदेवी. तीर्थरामाच्या घराण्याशी आपला कायमचा संबंध जोडला जावा अशा विचाराने तीर्थरामला आपला जावई करून घेण्याचे ठरविले. त्यानी आपले मनोगत हिराचंदांच्या कानावर घातले. त्यानाही त्यांचा प्रस्ताव आवडला. लगेच त्या काळच्या रूढी प्रमाणे

तीर्थरामचा वाङनिश्चय करुन टाकला. त्यावेळी तीर्थराम अवघे दोन वर्षाचे होते.

तीर्थराम पाच वर्षाचा होताच मुरालीवाला गांवातल्या पंतोजीच्या शाळेत जाऊ लागला त्या शाळेतील शिक्षक मौलवी महमद अली मुलाना शिकवण्यासाठी होते. त्याना मुलांची पारख चांगली होती. मुलाना कसे शिकवावे ते त्याना सहज जमे. मौलीवीचे उर्दू व पारशी भाषेवर विशेष प्रभुत्व होते. राम अतिशय बुद्धिमान आहे हे ओळखून त्याला स्वतंत्र्यपणे आधिक शिकवीत. रामची प्रगती उत्तम होऊ लागली. वयाच्या आठव्या वर्षी गुलिस्तान, व दोस्ताना हे दोन हे ग्रंथ रामाने मुखोद्‌गत केले. भाषेप्रमाणे गणितात रामाची बुद्धी विशेष चालत असे. लहानपणीच त्यानी वर्गमूळ आणि दशांश पद्धत अवगत केली. तो गणित सोडविण्यासाठी तासनतास बसे. अवघड गणिताची रीत माहीत नसली की त्या गणिताचे चिंतन करी काही काळानंतर अवघड वाटणारे गणित सोडवून मोकळा होई. मौलवीला ही गोष्ट कळल्यानंतर त्याना निरतिशय आनंद होई.

**शरीराकडे दुर्लक्ष :**

अभ्यासात रमल्यामुळे लहानपणापासूनच एकटे पणाची सवय लागली. तो फारसा कुणाशी मिसळत नसल्याने त्याला फारसे मित्रही नव्हते. त्याचा आवडता छंद म्हणजे फिरायला जाणे. सूर्यास्ताची मजा पाहाणे. पक्ष्यांचे शद्ब ऐकणे, नदीच्या प्रवाहाकडे एकटक बघत बसणे. कित्येकदा हा अंगणात पडून रात्रीच्या वेळी तासनतास ताऱ्याकडे पाहात राही. त्यांच्या तेजाचे त्याला विशेष आकर्षण होते. या सर्व गोष्टीमुळे शारीरिक व्यायामाकडे पूर्ण दुर्लक्ष झाले. इतर मुलांच्या मानाने रामाची प्रकृती किरकोळ होती. आणि अखेरपर्यंत ती तशीच राहिली.

**देवदेवतांचा छंद :**

आणखी आवडीचा विषय म्हणजे देव देवतांची दर्शने घेणे. धर्म कोरे रामाला मंदिरात बरोबर घेऊन जाई. तेथील घंटानाद पूजेवेळी शंखाचा नाद त्याला अतिशय आवडे. पुजारी 'ॐ नमः शिवाय' म्हणे त्या वेळी त्याचा ॐकार नाद देवळात भरून राही. रामाला ॐ म्हणण्यात आनंद वाटे. तो कधी कधी कीर्तनाला पण जाई. त्याला कीर्तन आवडे –

वयाच्या दहाव्या वर्षी प्राथमिक शिक्षण संपले. पूर्वी ठरल्याप्रणाणे हिराचन्दानी यानी तीर्थरामचा विवाह केला. पुढील शिक्षण घेऊन संसाराला हातभार लावावा ही हिराचन्दाची इच्छा होती. शिक्षणासाठी तीर्थरामाला गुजराणवाला या जिल्ह्याच्या ठिकाणी ठेवले. पहिली पत्नी गेल्यावर हिराचन्दानी दुसरे लग्न केले. दुसऱ्या पत्नीचे वडील पंडित नानकचंद हे गुजराणवाला येथे रहात होते. त्यांच्या मार्गदर्शना खाली मुलाला तेथे ठेविले. तेथील मिशन हायस्कूलमध्ये तीर्थरामानी प्रवेश मिळविला व शिक्षणाचा प्रारंभ झाला.

इंग्रजी भाषेच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष दिले. रामाची बुद्धिमत्ता व स्मरणशक्ती त्याला साथ देत असे. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी जवळ जवळ शंभर इंग्रजी कविता पाठ केल्या. रामाचे शिक्षक त्याच्यावर खूष होते. त्यांना वर्डस्वर्थ, बायरन, टेनिसन, शेक्सपीअर या प्रथित–यश कविजनांच्या कविता त्याला विशेष आवडत. इंग्रजी बरोबर उर्दू, पर्शिअन या भाषांचा सखोल अभ्यास केला. तुलशीदासजींचे रामचरित्र मानस वाचताना प्रभु प्रेमाने त्याला वेडे केले.

त्याच्या बुद्धिमत्तेची प्रचीती मिशन हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री चारीजी यांना आली. तेव्हा पासून रामावर त्यांची मर्जी बसली. सन १८८८ मध्ये मॅट्रिकची परीक्षा

झाली. गुणवत्ते प्रमाणे तीर्थराम परीक्षेत अडतीसावे आले. शिष्यवृत्ती मिळू शकली नाही याचे श्री चारीजीना वाईट वाटले. मॅट्रिकच्या पुढचे शिक्षण घ्यावे असे रामाला श्री चारीजीनी सांगितले व आवश्यक ती मदत करण्याचेही मान्य केले.

माध्यमिक शिक्षण चालू असता संत समागमाची आवड जोपासली गेली. त्याला चांगल्या संगतीचा लाभ घडला. सावत्र मावशीचे माध्यमिक शिक्षणात फारसे अडथळे निर्माण झाले नाहीत.

श्री हिराचंदनाशी त्यांची गाठ पडे त्यावेळी रामच्या प्रगतीबद्दल सांगत व त्याला भरपूर शिकवा. असा मुलगा आपल्या वंशात जन्मणे खरोखरी भाग्याचे आहे. त्यांच्या बोलण्याचे हिरानंदाना आनंद होई. मॅट्रिक नंतर मुलाने आपल्या संसाराकडे पाहावे. मॅट्रिक झाल्याने त्याला कोणीही नोकरी देईल. डॉ. रघुनाथ मल याना हे बोलणे बरे वाटत नसे. पंडितजी मुलगा आपला आहे. मी त्याच्या शिक्षणाचे काय ठरविणार? परंतु त्यानी पुढे शिकावे असे मला वाटते.

**पारमार्थिक गुरू :**

तीर्थरामाची पारमार्थिक क्षेत्रातही प्रगती झाली. त्याला एक महात्मे भेटले. त्यांचे नाव धन्नीराम. हे हिराचंदजींचे पण मित्र होते. परंतु त्यांना धन्नीरामच्या पारमार्थिक उंचीची कल्पना नव्हती. गुजराणवाला इथे तीर्थरामला शिक्षणासाठी ठेविले तेव्हाच रामकडे लक्ष देण्याबद्दल हिरानंदानी यानी धन्नीरामला सांगितले होते. धन्निराम हे एक असामान्य पुरुष होते. त्यांचे लौकिक शिक्षण फारसे नव्हते. धंद्याने ते तांबट होते. त्यांना व्यायामाची आवड होती. ते कुस्ती खेळात निष्णात होते. ते नैष्ठिक ब्रह्मचारी होते. त्यांनी एका महात्म्याच्या मार्गदर्शनाखाली समाधीचा अभ्यास केला होता. ते सतत दोन दिवस समाधीत होते. दुसऱ्याचे मन ओळखण्याची असमान्य शक्ती त्यांना प्राप्त झाली होती. श्रीकृष्ण हे त्यांचे आवडते दैवत. योग वासिष्ठावर ते प्रवचन करीत. ते मितभाषी होते. नास्तिकाला प्रभावीपणे ईश्वराबद्दल आस्था निर्माण करीत. राम म्हणतो अनेक वर्षे अध्यात्मावर अनेक ग्रंथ वाचले. मला जे मिळाले नव्हते ते भगतजींच्या दर्शनाने प्राप्त झाले. आपल्या गुरुवर रामाची अपार निष्ठा होती. दर ३/४ दिवसानी भगतजीना राम पत्र लिही जवळजवळ ११००पत्रे उपलब्ध झाली आहेत. रामच्या मनाचे पोषण आणि विकास भगत धन्नीराम यानी केले. हे सहज प्रत्ययाला येते. माध्यमिक शिक्षणानंतर गुजराणवाला शहराला त्यांनी कायमचा रामराम ठोकला. महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी लाहोर गाठले. पत्र प्रपंच तेथून झाला.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**


**- संपादक**

पुस्तक परिचय

# ग्रंथालयाच्या वर्गीकरणाची तात्त्विक बाजू स्पष्ट करणारे पुस्तक

*ग्रंथवर्गीकरण या विषयावरील एका पुस्तकाचा हा परिचय – संपादक*

एकापेक्षा आधिक विषय हाताळणारे ग्रंथ वा माहितीची साधने ग्रंथालयात ''अचूक जागी ठेवणे व वाचकाने मागणी केल्यावर तत्परतेने काढून देणे'' यासाठी या साहित्याची सुयोग्य पद्धतीने मांडणी करावी लागते. ही मांडणी म्हणजेच वर्गीकरण होय.




डोंबिवलीचे स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. श्रीनिवास मेघःश्याम आठल्ये यांनी ग्रंथालयातील वर्गीकरणाचे महत्त्व स्पष्ट करणारे ''ग्रंथ वर्गीकरण तात्त्विक'' हे पुस्तक अलीकडेच प्रकाशित केले. प्रत्यक्षात दिलेल्या संकेत अंकानुसार पुस्तके लावून ठेवणे हे प्रात्यक्षिकाचे काम झाले पण असे लावून ठेवण्यापूर्वी त्या मागील तत्त्वे कोणती आहेत. हे समजून घेणे हे तात्त्विक काम झाले. ग्रंथालय शास्त्राच्या प्रमाणपत्र परीक्षे पासून ते मुक्त विद्यापीठांच्या या परीक्षांपर्यंत हा विषय विद्यार्थ्यांना अभ्यासावा लागतो. विद्यापीठांचे अभ्यासक्रम मराठीतून आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना हा विषय समजून घेण्याच्या दृष्टीने मराठी पुस्तके लागतात व मराठीत या विषयावर म्हणावीत अशी चांगली पुस्तके नाहीत. त्या दृष्टीने श्री. आठल्ये यांचे हे पुस्तक उपयुक्त ठरणारे आहे.

वर्गीकरणाचा इतिहास पाहता ज्या काही पद्धती आहेत त्यांचे वर्गीकरण ड्यूईपूर्व वर्गीकरण व ड्यूई नंतरचे वर्गीकरण असे प्रकार केले जातात. या कालखंडात अनेक प्रकारच्या वर्गीकरण पद्धती उदयास आल्या व मागे पडल्या. मेलवील ड्यूई यांचे दशांश वर्गीकरण हे जगप्रसिद्ध व शास्त्रशुद्ध स्वरुपाने असल्याचे मानले जाते. कटर, रायडर, ब्राऊन, इत्यादी तज्ज्ञांनी निरनिराळ्या पद्धती तयार केल्या पण ड्यूईची पद्धत ही सोयीची म्हणून जास्त वापरली गेली.

अक्षरे, अंक, चिन्ह, पैलू अशा अनेक बाबींचा वापर वर्गीकरण करताना करता येऊ शकतो. प्रा. आठल्ये यांनी सदर पुस्तकात हा सर्व विषय सोप्या भाषेत स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे अशा विषयावरील पुस्तकात त्यांनी दिलेल्या तीन सूची विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणाऱ्या आहेत. १८९५ ते १९०५ या वरील वर्षात या विषयात बरेच मंथन जगभर झाले. त्यानंतरच्या काळात CRG सारख्या अनेक संस्थांनी या विषयात पुढील संशोधन केले. ड्यूईच्या आजवर २२ आवृत्या निघाल्या. सुरुवातीचे परिगणात्मक रूप पैलू युक्त पद्धतीकडे वळू लागले. हे सर्व तात्त्विक वर्णन आठल्ये यांनी चांगले केले आहे. मात्र अभ्यासक्रमांची मर्यादा घालून

घेतल्यामुळे भविष्यातील वर्गीकरणाची अवस्था काय असेल याचा विचार या ग्रंथात येत नाही. ग्रंथालयांना माहिती केंद्र असे स्वरूप प्राप्त होण्याच्या आजच्या काळात व ग्रंथेतर साहित्याचा उपयोग वाढणाऱ्या आजच्या काळात वेगळ्या प्रकारच्या वर्गीकरणांची गरज भासू शकते.

उपरोक्त अभ्यास क्रमांच्या दृष्टीने हे पुस्तक निश्चितच चांगले झाले आहे. या पुस्तकास प्रस्तावना लिहिणारे माजी ग्रंथपाल डॉ. प्रकाश करमकर यांनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे हा विषय तत्त्वज्ञान व गणित या दोन अंगांनी जाणांरा असल्याने अवघड आहे. परंतु आठल्ये यांची मांडणी, भाषा सहज आहे. त्यामुळे मराठीत एका कठिण विषयावर चांगले पुस्तक लिहिल्याबद्दल प्रा. आठल्ये यांचे अभिनंदन करावयास हवे.

ग्रंथ वर्गीकरण तात्विक
आठल्ये श्रीनिवास
डोंबिवली, मुग्धा प्रकाशक, २०११
पृ. १२४ मूल्य रु. २०० /-

**– स्नेहांकित**

●●●

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

**श्री. संदीप भावसर यांना ALCTS या अंतरराष्ट्रीय संस्थेतर्फे FERA 2011 चे प्रमाणपत्र.**

Association For Library Collection & Technical Services या अंतरराष्ट्रीय संस्थेतर्फे दरवर्षी विकसनशील देशातील ग्रंथपालासाठी Fundamentals of Electronic Resources Acqusitions (FERA 2011) या online वर्गाचे आयोजन केले जाते. जगभरातील विकासनशील देशातून यांची निवड होऊन त्यानी हा अभ्यासक्रम ७१% गुण मिळवून उत्तीर्ण केला आहे.

याबद्दल त्याचे अभिनंदन!

श्री. संदीप भावसर,
ग्रंथपाल
डॉ. व्ही.एन. बेडेकर व्यवस्थापन
अभ्यास संस्था

मा. संपादक,

मी दिशाचा नियमित वाचक आहे. दिशातील लेख, त्यांची मांडणी व मुद्रण सर्वच चांगले असते. जैव तंत्रज्ञान, अवकाश विज्ञान अशा विषयावरील लेख दिशातून द्यावेत ही अपेक्षा.

– श्री. आनंद परब
रामवाडी, नौपाडा, ठाणे.

# कृष्णाष्टकम्

*दिशाचे हितचिंतक व वाचक श्री. नीलकण्ठसुत यांनी शंकराचार्यांच्या कृष्णाष्टकम् या स्तोत्राच्या केलेल्या काव्यानुवाद येथे मूळ श्लोक व अर्थासह देत आहोत. - संपादक*

**श्रियाश्लिष्टो विष्णुः स्थिरचरवपुर्वेदविषयो**
**धियां साक्षी शुद्धो हरिसुरहन्ताब्जनयनः।**
**गदी शङ्खी चक्री विमलवनमाली स्थिररुचिः**
**शरण्यो लोकेशो मम भवतु कृष्णोऽक्षिविषयः ।।१ ।।**

•• •• ••

करपाशी तव रमा व्यापका वेदविषय तू विश्वतनु
मतिसाक्षी तू कमलनेत्रहरि अमलमना तू दैत्यहनु
अक्षयकान्ती वनमाली तू शंख चक्र अन् गदा करी
भक्त तारका विश्वधारका प्रकट रूप तव दावि हरि ।।१ ।।

•• •• ••

ज्याला लक्ष्मीने अलिंगन दिलेले आहे. जो सर्वव्यापक आहे. संपूर्ण चराचर विश्व ज्याचे शरीर आहे. वेद ज्याचे वर्णन करतात, जो सर्वांच्या बुद्धीचा साक्षी आहे, जो शुद्ध, सर्व दोषरहित आहे, भक्तांची सर्व दुःखे हरण करणारा आहे, असुर -दैत्य-राक्षस ह्यांचा नाश करणारा आहे, ज्याचे नेत्र कमलाप्रमाणे सुन्दर आहेत, ज्याच्या हातात गदा, शंख, चक्र ही आयुधे आहेत, गळ्यांत निर्मळ वनमाळा आहे, अंगकान्ती सुस्थिर आहे, सर्व शरणागतांचे रक्षण करणारा व सर्व लोकांचा अधिपती आहे असा भगवान श्रीकृष्ण मला प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसावा. ।।१ ।।

---

**यतः सर्वं जातं वियदनिलमुख्यं जगदिदं**
**स्थितौ निःशेषं योऽवति निजसुखांशेन मधुहा।**
**लये सर्वं स्वास्मिन् हरति कलया यस्तु स विभुः**
**शरण्यो ।।२ ।।**

•• •• ••

जलवायूसह या विश्वाचा तूच स्वयंभू निर्माता
पालन पोषण रक्षण करिसी सहजानन्दे मधुहन्ता
लीला विभवे स्वतःमध्ये रे विश्वाचा तू विलय करी
भक्ततारका विश्वधारका प्रकटरूप तव दावि हरी

•• •• ••

सृष्टीकालात आकाश, वायु इत्यादी पंचमहाभूतात्मक, अखिल विश्व ज्याच्या पासून उत्पन्न होते आणि स्थितीच्या वेळीही जो आपल्या आनन्दांशाचे त्याचे रक्षण करतो, मधु नावाच्या दैत्याला ज्याने मारले, प्रलय काली सर्व विश्वाला जो आपल्यामध्ये सहज लीलेने विलीन करून घेतो. असा सर्व वैभव सम्पन्न भक्तवत्सल त्रैलोक्याधिपती भगवान श्रीकृष्ण मला प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसावा. ।।२ ।।

---

**असूनायम्यादौ यमनियममुख्यैः सुकरणै**
**र्निरुध्येदं चित्त हृदि विलयमानीय सकलम्।**
**यमीड्यं पश्यन्ति प्रवरमतयो मायिनमसौ**
**शरण्यो. ।।३ ।।**

•• •• ••

ज्ञानीजन जे यमनियमासह प्राणायामा आचरिती
चित्तविरोधे संसाराचा मूलकारणी लय करिती
हृदयाकाशी मायाधीश्वर प्रकटे मग श्रीकृष्णहरि
भक्ततारका विश्वधारका प्रकट रूप तव दावि हरी ।।३।।

•• •• ••

यम नियमादि उपायांनी, प्रथम प्राणांचे नियमन करून

(प्राणायामाचा अभ्यास करून) बुद्धिमान लोक चित्ताचा निरोध करतात व त्यायोगें सम्पूर्ण विश्वाचा मूलकारणात (ब्रह्मात) लय करून आपल्या हृदयात ज्याचा साक्षात्कार करून घेतात, जो सर्वथैव स्तुती करण्यास योग्य व मायेचा अधिपती आहे असा भक्तवत्सल लोकस्वामी भगवान श्रीकृष्ण मला प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसावा. ।।३ ।।

— — — — — — — — — — — — — — — —

**पृथिव्यां तिष्ठन् यो यमयति महीं वेद न घरा**
**यमित्यादौ वेदो वदति जगतामीशममलम् ।**
**नियन्तारं ध्येयं मुनिसुरनृणां मोक्षदमसौ**
**शरण्यो. ।।४ ।।**

•• •• ••

इथेच आहे इथेच राहे सकल नियन्ता धरतीचा
स्वयंधरा हे सत्य न जाणे बोध सांगतो वेदांचा
श्रेयस्कर श्रीहरी सुरवरा अमल नियामक मोक्षकरी
भक्ततारका विश्वधारका प्रकट रूप मज दावि हरी ।।४ ।।

•• •• ••

जो पृथ्वीमध्ये राहून पृथ्वीचे नियंत्रण करतो पण पृथ्वी ज्याला जाणत नाही अशा वाक्यांनी देव ज्याचे वर्णन करतात जो जगाचा स्वामी आहे, निर्मल आहे, नियामक आहे, ध्यान करण्याला योग्य आहये. ऋषी, देव व मानव ह्यांना मोक्ष देणारा आहे असा भक्तवत्सल. लोकस्वामी भगवान श्रीकृष्ण मला प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसावा. ।।४ ।।

— — — — — — — — — — — — — — — —

**महेन्द्रादिर्देवो जयति दितिजान्यस्य बलतो**
**न कस्य स्वातंत्र्यं क्वचिदपि कृतौ यत्कृतिमृते ।**
**कवित्वादेर्गर्वं परिहरति योऽसौ विजयिनः**
**शरण्यो. ।।५ ।।**

•• •• ••

असुरांवरती विजय सुरांचा कुणात आहे ही क्षमता
कोण म्हणे मी कर्ता आहे त्याच्याविण ना कुणि कर्ता
रणांगणी वा काव्यप्रांगणी यशप्राप्तीचा दंभ हरी
भक्ततारका विश्वधारका प्रकट रूप मज दावि हरी ।।५ ।।

•• •• ••

ज्याच्या बळावरच इन्द्रादि देव दैत्यांना जिंकतात, ज्याच्या कृतीशिवाय कोणालाही कोणत्याही कर्मात स्वतंत्रता नाही, जो कवी, विजयी इत्यादीच्या कवित्व, विजय इत्यादि गोष्टीबाबतचा अभिमान नष्ट करतो, असा तो भक्तवत्सल, लोकनायक भगवान श्रीकृष्ण मला प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसावा. ।।५ ।।

— — — — — — — — — — — — — — — —

**विना यस्य ध्यानं व्रजति पशुतां सूकरमुखां**
**विना यस्य ज्ञानं जनिमृतिभयं यति जनता ।**
**विना यस्य स्मृत्या कृमिशतजनि याति स विभुः**
**शरण्यो ।।६ ।।**

•• •• ••

हरि ध्यानाविण अधोगतीची सूकर ओंगळ पशुयोनी
हरि ज्ञानाविण फिरे भयाचे जन्म – मरण हे चक्र जनी
हरि नामाविण जीव शेकडो कृमियोनींतुनि भ्रमण करी
भक्ततारका विश्वधारका प्रकट रूप मज दावि हरी ।।६ ।।

•• •• ••

ज्याचें ध्यान केले नाही तर मनुष्य डुकराच्या, पशूच्या जन्माला जातो, ज्याचे ज्ञान झाले नाही तर मनुच्याचे जन्ममरणाचे भय जात नाही, ज्याचे स्मरण केले नाही तर मनुष्याला शेकडो कृमिकीटकांचे जन्म घ्यावे लागतात, असा तो भक्तवत्सल लोकनायक भगवान श्रीकृष्ण मला प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसावा. ।।६ ।।

— — — — — — — — — — — — — — — —

**नरातङ्त्तङ्कः शरणशरणो भ्रान्तिहरणो**
**घनश्यामो कामो व्रजशिशुवयस्योऽर्जुनसखः ।**
**स्वयम्भूर्भतानां जनक उचिताचारसुखदः**
**शरण्यो .।।७ ।।**

•• •• ••

भय संहारी भक्त उद्धरी भ्रान्तीचे जो हरण करी
स्वरुप सुन्दर श्यामलवर्णी गोप धनंजय मित्र हरी
जीवांचा जो जनक स्वयंभू सज्जनमाचा सौख्यकरी
भक्त तारका विश्वधारका प्रकट रुप मज दावि हरी ।।७।।

•• •• ••

जो प्राण्यांचे भय दूर करणारा आहे. शरण आलेल्यांचे संरक्षण करतो, भ्रान्तीचा नाश करतो, ज्याची कान्ति पाण्याने भरलेल्या ढगाप्रमाणे म्हणजे सावळ्या रंगाची आहे, जो अत्यन्त सुंदर आहे, गोपबालकांचा समवयस्क मित्र आहे, अर्जुनाचा सखा आहे, स्वयंभू आहे. सर्व प्राणिमात्रांचा जनक आहे, योग्य आचरण करणाराला सुख देणारा आहे असा भक्तवत्सल भगवान श्रीकृष्ण मला प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसावा. ।।७।।

---

**यदा धर्मग्लानिर्भवति जगतां क्षोभकरणी**
**तदा लोकस्वामी प्रकटितवपुः सेतुधृगजः।**
**सतांधारा स्वच्छो निगमगणगीतो व्रजपतिः**
**शरण्यो ।।८।।**

•• •• ••

धर्मा मरगळ यऊनि जेव्हा अधर्म माजे महीवरी
धर्म संस्कृती पुनरुत्थायाा देह धरी प्रत्यक्ष हरी
निर्मळ प्रेमळ जन्मरहित श्री वेदविषय सद्धर्म हरी
भक्त तारका विश्वधारका प्रकट रूप तव दावि हरी

•• •• ••

जेव्हा सर्व जगाला क्षोम निर्माण करणारी-अस्थिरता निर्माण करणारी अशी ग्लानी धर्मामध्ये येते जगन्नायक भगवान अवतार घेउन लोक - मर्यादा व धर्म मर्यादांचे रक्षण करतो. जो अहन्मा आहे, स्वतः निर्मल आहे. सर्व वेदांनी ज्याचा महिमा हायिला आहे असा गोकुळ-ब्रजभूमीचा अधिपती भक्तवत्सल भगवान श्रीकृष्ण मला प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसावा. ।।८।।

**इति हरिरखिलात्माराधितः शङ्करेण**
**श्रुतिविशदगुणोऽसौ मातृमोक्षार्थमाद्यः।**
**यतिवरनिकटे श्रीयुक्त अविर्वभूव**
**स्वगुणवृत उदारः शङ्खचक्राब्जहस्तः।।९।।**

•• •• ••

प्रिय मातेच्या मुक्तीसाठी आद्यशंकरे श्री चरणी
स्तोत्र गायनी पूजा करिता श्रुति-प्रतिपादित आद्यहरी
उदार सायुध गुण रत्नाकर प्रसन्न होउनि यतीवरी
अर्धांगीसह स्वयें प्रकटले परमात्मा श्री कृष्णहरी ।।९।।

•• •• ••

आपल्या आईला मुक्ती मिळावी म्हणून ह्याप्रमाणे श्री शंकराचार्यांनी अखिल जगताचा आत्मा असलेल्या श्री कृष्णाची आराधना केली. तो सर्वांची दुखे हरण करणारा म्हणून हरी आहे. वेदांनी त्याचे गुण विशद करून सांगितले आहेत, तो सर्व जगाचे मूळ कारण आहे म्हणून त्याला आद्य म्हणतात. तो मोठा उदार आहे, तो आपल्या स्वयंसिद्ध गुणांनी सम्पन्न असा आनन्दकन्द भगवान श्रीकृष्ण, शंख, चक्र, गदा, पद्य धारण करून लक्ष्मीसह शंकराचार्यांच्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष उभा राहिला. ।।९।।

।।इति श्रीमत् शंकराचार्यविरचितं कृष्णाष्टकम् संपूर्णम्।।

(श्रीमद्आद्यशंकराचार्य)

---

भावानुवाद
**नीलकण्ठसुत**
२३ नोव्हेंबर २००९
२५ नोव्हेंबर २००९

•••



पुस्तक परिचय

# साहित्य- जगत

*ग्रंथ प्रसारक श्री. शरद जोशी यांनी नव्याने आलेल्या पुस्तकांचा करून दिलेला हा परिचय*

## डॉ. गो. का. केतकरकृत' सांगीतिक कान: मोजमाप आणि सुधारणा

लेखक परिचय

डॉ. गो. का. केतकर ('निवारा', टिळकपथ, सुयोग मंगल कार्यालयाजवळ, डोंबिवली पूर्व जि ठाणे – ४२१२०१, यांनी शास्त्रज्ञ म्हणून 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च आणि भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर मुंबई येथे काम केले. गेली काही वर्षे त्यांनी भौतिकशास्त्र आणि संगीत या विषयांवर संशोधन केले. त्यातून कानाची सांगीतिक क्षमता मोजणारा निर्देशांक निर्माण झाला. मराठीमध्ये स्वरांक किंवा इंग्रजीमध्ये Musical Notes Quotient-MNQ असे त्याचे नामकरण झाले दोन लगतच्या स्वरांमधील किती सूक्ष्म बदल कानाला जाणवतो हे स्वरांक दाखवतो. हा स्वरांक सुधारण्यासाठी साधनेचे वर्ग सातत्याने डोंबिवली मध्ये घेत आहेत.

### सांगीतिक कान मोजमाप आणि सुधारणा :

(प्रस्तुत पुस्तक लिहिण्याअगोदरची डॉ केतकरांची याच विषयावरची दोन पुस्तके अशी: स्टडी ऑफ फ्रिक्वेन्सी रेझोल्यूशन ऑफ ह्यूमन इयर अँड इट्स इंप्लिकेशन टु म्युझिक टिचिंग (इंग्रजी) व 'स्वरांक आणि ॐकाराधिष्ठित स्वरसाधना (मराठी) प्रस्तुत पुस्तकाची पृष्ठे आहेत ७६ व मूल्य आहे रु २००/– ही तिन्ही पुस्तके डॉ. शर्वरी केतकर ऐश्वर्या प्रकाशन (पत्ता वरील प्रमाणे) यांनी प्रसिद्ध केलेली आहेत. जगद्विख्यात संगीत शास्त्रज्ञ पद्मभूषण प्रो. आर. सी. मेहता यांची छोटीशीच पण डॉ. केतकर यांचा सार्थ गौरव करणारी प्रस्तावना या छोटेखानी परंतु दर्जेदार पुस्तकास लाभलेली आहे.

डॉ. केतकर यांच्या संशोधनाचा हा मोनोग्राफ वाचल्यावर एक वेगळे समाधान मला मिळाले. अनुभव सिद्ध संगीत संशोधनाची परंपरा आपल्याकडे सांगीतिक सादरीकरणाच्या रुपाने दिसते. आधुनिक काळात तर्कशुद्ध वैज्ञानिक संशोधनाच्या दृष्टीने डॉ. केतकर यांचे संशोधन निश्चित महत्त्वाचे ठरते. डॉ. केतकर ह्यांच्या संशोधनाची खुद्ध भारतीय संगीताच्या क्षेत्रात आधिकधिक जाणकारीने निश्चित चर्चा व्हावी या दृष्टीने या नवीन संशोधनाचे स्वागत व्हायला हवे.

या पुस्तकाची ५ प्रकरणे आहेत १ संगीत, २ स्वरांक ३ स्वरांक सुधारता येतो, ४ संशोधनासाठी प्रकल्प व ५ आवाहन. पुस्तकाच्या सुरुवातीस अनुक्रमणिकेमध्ये लेखकाचे, प्रकाशकाचे मनोगत, हार्दिक शुभेच्छा इ. गोष्टी आहेत. संगीत प्रेमी व संगीताच्या अभ्यासकांनी ती मुळातूनच वाचावी. या पुस्तकातील ७ परिशिष्टे (सोनोमीटर, हार्मोनियम, तम्बोरा लावण्याची पद्धत, तंबोऱ्यातील बारा स्वर, तुलना, शुद्ध व टेम्पर्ड सप्तक, केतकर पद्धतीचे चार आधारस्तंभ व प्रार्थना) अत्यंत महत्त्वाची आहेत. ती अभ्यासकांनी काळजीपूर्वक वाचावीत.

### जाणकारांनी केलेला गौरव :

अ. भा. गांधर्व महामंडळाचे संगीताचार्य आणि ध्वनिमुद्रण ग्रंथालय समितीचे संयोजक डॉ. द्विग्विजय वैद्य,

ख्यातनाम गणित शास्त्रज्ञ आणि संख्याशास्त्रज्ञ डॉ. बी के. काळे, पुणे विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक सायन्स विभागाचे प्रमुख आणि नॅनोटेक्नॉलॉजी व एम्बेडेड टेक्नीक या विषयांतील आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ डॉ. शाळिग्राम यांचे पुरस्कार या पुस्तकास लाभले आहेत.

या पुस्तकातील सारी माहिती शास्त्रीय दृष्टिकोनातून काटेकोरपणे पण सोप्या भाषेत सविस्तरपणे सांगितल्याबद्दल डॉ. केतकर यांचे मनपूर्वक अभिनंदन (इंग्रजी व हिंदी भाषातूनही हे पुस्तक प्रसिद्ध झालेले आहे)

**सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी**

श्री. प्र. सी. मराठे (४०२, सनफ्लॉवर ठक्कर पार्क वाकोला, सांताकुज पूर्व, मुंबई – ४०००५५) लिखित व केशव भिकाजी ढवळे श्रीसमर्थ सदन, १ ली भटवाडी, गिरगाव, मुंबई – ४००००४ या ख्यातनाम प्रकाशनसंस्थेने प्रकाशित केलेली सुबोध अनुष्टप ज्ञानेश्वरीच्या (ग्रंथाचा आकार – डबल डेमी ११" X ९" पृष्ठे ९५२ रंगीत फोटो, उत्तम छपाई, सहजसुलभ भाषा असा हा अद्वितीय ग्रंथ किंमत रु ८००/–) प्रती महाराष्ट्रातल्या सर्व प्रमुख विक्रत्यांकडे जानेवारी २०१२ मध्ये उपलब्ध होणार आहेत.

आध्यात्मिक लेखन करणारे ख्यातनाम साक्षात्कारी कृष्णभक्त श्री. दिवाकर अनंत घैसास (ए – २०१, अनंत सोसायटी नं २, पेडसेनगर क्रॉस रोड नं ५ डोंबिवली – पूर्व – ४२१२०१) यांचे मार्गदर्शन या अपूर्व ग्रंथास लाभले आहे 'अहो आश्चर्य' म्हणावे अशी थोर कलाकृती बहीणच आहे. मूकं करोति वाचालं पंगु लंघयते गिरीम अशी कृपा करणाऱ्या गोविंदाचा वरदहस्त लाभल्यावर श्री. मराठे यांच्या प्रतिमेने उड्डाण केले. आणि कमालीच्या साध्या सोप्या मराठीत नटूनथटून त्यांच्यापुढे श्लोकांच्या रूपात हात जोडून उभ्या राहिल्या. श्री. प्र. सि. मराठे यांचे हे प्रचंड कार्य श्रीकृष्णाच्याच कृपेने पार पडले आहे. या ग्रंथाचे त्यांनी मराठी वाङ्मयात एक इतिहासच घडविला आहे.

डॉ. विजय तारेकृत 'संगीत: चिकित्सा आणि उपचार पुस्तक. ही एक वैकाल्पिक चिकित्सा पद्धती आहे. कोणत्याही व्यक्तीच्या रोगाबद्दलची वैज्ञानिक दृष्टिकोन लक्षात घेऊन केली जाते. कारण संगीत हे औषध नाही. संगीत श्रवणामुळे मनावर आणि शरीरावर होणारा मुख्य परिणाम म्हणजे चैतन्य किंवा उर्जास्त्रोत जागृत होणे. भारतीय संस्कृतीमध्ये रोग निवारण्याच्या दृष्टीने संगीताचे प्रयोग करण्याची प्राचीन परंपरा हेच सिद्ध करते. कारण चिकित्सापद्धत कोणत्याही उपचार पद्धतीस साहाय्यभूत ठरते. औषधोपचारांबरोबरच संगीत चिकित्सेमुळे रोग बरा होण्यास मदतच होते असे आढळून येते. संगीत चिकित्सेच्या पैलूबद्दलच्या माहितीचा या पुस्तकामुळे वाचकांना लाभच होईल.

'संगीत: चिकित्सा आणि उपचार' या उत्कृष्ट पुस्तकाच्या मलपृष्ठावरील हा मजकूर पुरेसा बोलका आहे डॉ. विजय तारे (१०४, कोणार्क अपार्टमेंट, १६/२ नमोरमा गंजे, इंदूर –४५२००१ (म प्र)) यांचे हे अत्यंत उपयुक्त पुस्तक ((पृ. १२०, मूल्य १२५/–) मैत्रेय प्रकाशनाने (पारधी हाऊस, तिसरा मजला, एम् जी रोड, जैन मंदिरासमोर, विलेपार्ले पू. मुंबई – ४०००५७.) प्रकाशित केले आहे. वैद्यकीय क्षेत्राखेरीज त्यांनी संगीतात बी. ए. पदवी प्राप्त केलेली आहे. इंग्रजी व हिंदी भाषांवरही त्यांचे प्रभुत्व आहे. हिंदी भाषेत त्यांनी अनेक पुस्तके लिहिलेली आहेत. डॉ. तारे व मैत्रेय प्रकाशन यांना धन्यवाद.

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी, देवी चौक,
शास्त्रीनगर, डोंबिवली – ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२–४८६९६७

●●●

# भारतीय संस्कृती - बीज मॉडेल व साधना


*बीज, मॉडेल व साधना या लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

**प्रास्ताविक**

'दिशा' च्या डिसेंबर २०११ अंकात आपण भारतीय संस्कृतीवर आधारलेल्या **'दैशिकशास्त्र'** ह्या राज्यशास्त्र, समाजशास्त्र व अध्यात्मशास्त्र ह्यांचा संबंध ह्यावर परिचयात्मक 'शोध' घेतला.


एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे की समाजव्यवस्थेमध्ये योग्य ते बदल व समन्वय घडवून आणणे हा खऱ्या उत्तम 'राज्यशास्त्राचा' उद्देश असतो वा असावयाला हवा! ! ह्या सुधारित किंवा संतुलित समाजव्यवस्थेला सुस्थितीत ठेवणे, हे राज्यकर्त्याचे काम व जबाबदारी रहाते. पण त्याची यंत्रणा काय असू शकते? त्याला वैश्विक अनंत काळ चालणाऱ्या 'सनातन' **विश्वधर्म (Spiritual Law)** चा आधार हवा!!

पण, ह्या समाजाचे **'एकक'** म्हणजे **'युनिट'** हे **'माणूस'** हेच आहे ना?



Picture No 3

मग ह्या माणसाची 'वैश्विक सत्यता' काय दर्शविते? सर्वसाधारणपणे १०० वर्षे आयुष्यमर्यादा असणारा, हा मर्त्य मानव, हीच ना? शिवाय अशा तऱ्हेच्या मोठ्या व्यक्ती समूहाचा समाज हाही पर्यायाने **'मर्त्य'** ह्याच संज्ञेला प्राप्त होतो ना? मग ह्या तोकड्या जीवन समूहाची धारणा, ध्येय, जीवन उद्देश, हेतू, अनंतातील सातत्य कोणत्या परिमाणाने मोजावयाचे?




**समाजव्यवस्था उद्देश**

ह्या व्यक्ती व समाजावर एक प्रगतीशील अशा पद्धतीची समाजव्यवस्था स्थापन करण्याची जबाबदारी जी संस्था घेऊ इच्छिते, तिचे मार्ग व जीवनाबद्दलचे विचार व ज्या विश्वात ही जीवन धारणा अस्तित्वात असते. तिच्या बद्दलची शास्त्रीय वा तात्विक काय भूमिका आहे हे विचारणे व जाणणे. आवश्यक नाही का? जगातील आजपर्यंतच्या इतिहासात व आजही अनेक मार्गांनी व पद्धतींनी हा शोध चालू आहे. फक्त काही अंशानेच!!

पण, हे प्रश्न उद्‌भवल्यानंतर त्यांचे सविस्तर व परिपूर्ण उत्तर वा समाधान या एका लेखात अशक्यच असल्याने, आपण एक 'प्रामाणिक शोध', जो आज अपूर्णावस्थेत आहे, त्या रोखाने शोधणार आहोत. भारतीय संस्कृतीत वेदिक सनातन धर्मावर आधारलेल्या **'दैशिक शास्त्राच्या'**



रोखाने आज बघणार आहोत. हा प्रयत्न राजकीय स्तरावर **पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी** सुरू केला. त्यातील उपलब्ध उत्तरे शोधणार आहोत.

ह्याचे एक उघड कारण हे आहे की हा प्रयोग व जीवन पद्धती 'ह्या भूमीवर' अनेक शतके किंवा युगेही अस्तित्वात आहे व आजही तिच्या खुणा स्पष्ट व अस्पष्ट स्वरूपात सूज्ञ माणसांना दिसू शकतात.

''ब्रम्हाच्या आज्ञेने मनूने'' निर्माण केलेल्या मूळ 'मानवधर्मशास्त्राचे' - 'दैशिक शास्त्र' **अर्धशोधित (स्वरूपातले)** हे एक संतुलित व प्रगतीशील समाजव्यवस्था राबवण्याचे अंग होते, हे आपण मागल्या अंकात आपण पाहिले. ह्या शास्त्राचे शुद्ध व स्पष्ट पूर्ण स्वरूप आज बिलकूल उपलब्ध नसल्याने, त्याची काही प्रगट साधने व नियम हाताशी आले आहेत, त्यावर आज विचार करू या!!

### भारतीय संस्कृतीतील शास्त्र संकल्पना

प्रथम एक गोष्ट लक्षात ठेवावयाला हवी की **भारतीय संस्कृतीत कुठलेही एखादे शास्त्र हे एक विवक्षित विषयाला बांधलेले अंग हे 'अवयवी' पद्धतीने अनेक संबंधित शास्त्रांना मूळ संबंधित शास्त्रांना मूळ तत्वांना संलग्न व समन्वयी वा 'एकात्म' पद्धतीने बांधलेले असते.** त्याचे आधार व तत्वज्ञान, हे ह्या 'शरीराच्या' इतर 'अवयव' वर मूळ 'आत्मिक' हेतूंशी बांधलेले असते. त्यामुळे इतर काही 'ज्ञान शास्त्रे उदाहरणार्थ जशी **'जातिधर्म', 'वर्णाश्रमधर्म', 'आचारधर्म'** ज्यांचे मूळ बीज 'सनातन धर्म (Law of the universe & Life) असते, त्यांतील मूळ तत्वे व हेतू ह्यांच्याशी सुसंगत व सुस्वर नात्यांशी बांधलेले असते. तसेच, आपण मागच्या अंकात असे पाहिले कीं ''राज्यकर्ते व समाज हे दोन्हीही श्रेष्ठ व 'दैवी संपत्तीने' युक्त असावयाला हवेत, तरच 'सुराज्य' ('ब्रह्मराज्य' - पुढे पाहू या) स्थापन होऊ शकेल. हे साधण्याकरिता पाश्चात्य संस्कृतीमध्ये कुठचीही परिपूर्ण व समाधान देणारी व फल देणारी साधने वा कोणतीही सत्यदर्शी व सत्यावर आधारित योजना नाही. समाजव्यवस्थेचे प्रयोग चालू आहेत. पाया पक्का नसल्याने धडपडत आहेत!! इथे 'सत्य' चा अर्थ ''वैश्विक सत्य'', म्हणजे अविनाशी व चिरंतन तत्व हा होय. अशा तत्वांचा (अदृश्य, गूढ, अव्यक्त) शोध, भारतीय वेदिक ऋषींना 'अपौरूषेय वेदामध्ये' गवसला व तोही 'समाधिजन्य ज्ञान' पद्धतीने!!

काय आहेत ह्या शास्त्राचे आधारभूत निष्कर्ष?

१) हा समाज घटक किंवा एकक मानव शरीरधारी, वस्तुतः एक, 'अमर्त्य जीवात्मा' व नाशिवंत शरीर, ह्यांचा जोडलेला संयुक्त ('शरीरबद्ध चैतन्यशक्तीचा') जीव आहे.

२) ह्या जीवाचे पृथ्वीवरील वास्तव्य, सीमित जवळजवळ १०० वर्षाचे आहे.

३) ह्या जीवात्माला त्याच्या देहप्राप्त इंद्रिये व जीवन व्यवस्थेयमधून 'प्रकृतीच्या' (Nature) मदतीने, सृष्टीच्या मदतीने व तिच्या जन्म, वृद्धी, वार्धक्य व मृत्यू व पुनःपुनर्जन्म ह्या क्रमाने जीवन कंठावे लागते. त्यामध्ये अनेक जन्म व मृत्यू (शरीराने) हे केवळ उंबरठे आहेत. पृथ्वी व सत्यलोक ही दालने आहेत.

४) पण, सूक्ष्म ज्ञानाने असे जाणवते की ह्या जीवनक्रमात ह्या 'जीवात्म्याचेच' अनेक पातळीवर संस्करण होत असते ह्या वैश्विक संस्करणाचा, 'दैहीक मृत्यू', हा शेवट नसून, त्याचा प्रवास अनंत काळ चालू रहातो. हा वैश्विक ('Road Map') दिशामार्ग आहे?

५) त्यामुळे, ह्या 'संस्करणाचा' हेतू, ध्येय व तंत्र शोधून तो प्रयोग अत्यंत जाणीवपूर्वक करणे व स्वीकारणे आवश्यकच नव्हे तर 'खरे जीवन शिक्षण आहे. नाहीतर ते जीवन असंस्कारित वा साधे 'प्राणिजीवन' ठरू शकेल. जसे 'आहार, निद्रा, भय, मैथून' चौकटीबद्ध असते. इत्यादी!! मानव जन्म एव्हढ्या क्षुल्लक पातळीवर जगण्यासाठी निश्चितपणे झालेला नाही.!!

६) हा 'व्यष्टि-समष्टी' संबंध' सुद्धा ह्या एकात्म संस्कारणाचाच एक संयुक्त भाग आहे. ह्याची स्पष्ट जाणीव असावयाला हवी. मानवी जीवन व निसर्ग,पशू, पक्षी व आकाश, ग्रह तारे ह्यांचे अस्तित्व व कार्य हे सुद्धा ह्या 'सर्वहूत यज्ञाचाच' भाग आहे. (आधुनिक भाषेत योगी अरविंदाच्या संकल्पनेत हा 'Integral Sociology' चा अविष्कार आहे!!)

७) त्यामुळे ह्या यंत्रणेचा शोध घेऊन 'भारतीय संस्कृतीत' वेदज्ञानावर आधारलेले अनेक 'संस्कार' योजले गेले आहेत.


८) या संस्कारांचा मूळ हेतू आजच्या समाज स्मृतीतून जवळ जवळ लोप पावला आहे. सध्याची जीवनपद्धती ही 'पाश्चात्य संस्कृतीच्याच' पातळीवर व धर्तीवर कार्यरत आहे. व त्या संस्कृतीचा पाया बहुतांशी भौतिकवादी आहे.



९) ह्या 'संस्काराचे पुनर्शोधन **स्वामी दयानंद,** (आर्यसमाज) वगैरे विभूतींनी प्रयत्नपूर्वक केले आहे. **'१६ संस्कार विधी'** पुस्तक ह्यावर मी दिशाच्या मागील काही अंकात भाष्य केले आहे. पण, तरीही ही पद्धती केवळ पृष्ठभागावरील अपूर्ण व विस्कळीत स्मृतीच्या पातळीवरच आहे. त्यातील प्रत्यक्ष क्रिया ह्या 'वैश्विक सत्य तत्वे व शक्ति ह्यांच्या पातळीवर योग व मंत्रशास्त्राने व्हाव्या लागतात त्याचे पूर्ण ज्ञान व सिद्धी आज अस्तित्वात दिसत नाहीत. त्या संस्कारशास्त्राची 'छाया स्मृति' किंवा 'कलेवरेच' आज समाजज्ञानात आहेत. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ह्यावर संशोधन व पुनर्निमाण आवश्यक आहे.

त्यामुळे आदर्श समाजव्यवस्थेच्या योजनेसाठी ज्या श्रेष्ठ पुरुष व श्रेष्ठ समाजाची आवश्यकता आहे. त्याबद्दल केवळ 'वैचारिक माहिती' वा 'छायास्मृती' आज अवगत असलेल्या तुटपुंज्या दैशिकशास्त्र संहितेमध्ये काय आहे ते पाहू या.

एक गोष्ट लक्षात ठेवावयास हवी की 'भारतीय वेदिक शास्त्रे' ही केवळ मानव संकल्पित नव्हेत. तर सत्य व ऋत 'वैश्विक यंत्रणेचा' भाग असतात.




त्यामुळे 'दैशिक शास्त्रात'मनुष्यावर परिपूर्ण संस्कार करण्यासाठी 'आधिजीविक' शास्त्राचा आधार घेतला आहे. त्यांत अग्नि, वेदिक देवता व मंत्रशास्त्राचा आधार आहे. ह्या संस्कारांचा उद्देशही 'अधिजनन' शास्त्राप्रमाणे 'दैवीसंपदयुक्त' मनुष्ये बनवणे हा आहे. इथे, महत्वाची गोष्ट ध्यानात घेणे अत्यावश्यक आहे. 'अधिजनन' व 'अधिजीविक' दोन्हीही शास्त्रामधील गृहीत तत्वे ही वैदिक सनातन धर्मावर आधारलेल्या 'सत्य व ऋत ' ह्या तत्वावर सत्‌चित आनंद' अशा शक्तीवर आधारलेली विश्व रचना आहे त्यावर प्रकाश टाकणारी व आधारभूत आहेत. ते पुन: सांगतो आहे त्यामुळे, पृथ्वीवरील मानवाच्या व इतरही जीवसृष्टीच्या एका बाजूला मर्त्य व सीमित आयुष्य मर्यादेच्या व दुसऱ्या बाजूला प्रकृती (निसर्गाच्या नियमावर) वर आधारलेल्या व नातेसंबंध असलेल्या वस्तुस्थितीवरील मानवी समाजव्यवहार व्यवस्था त्याचे हे शास्त्र आहे. 'संस्कार' ह्याचा अर्थ **'गुणशास्त्रातील'** गुणप्रवृत्तीचा 'मात्रा निदर्शक' आहे. तेव्हा संस्काराची मानवी जीवांनापुरती दैवीसंपदा युक्त गुणप्राप्ति करुन देण्याची व्याप्ति केवळ ऐहिक जीवन मर्यादित नसून, ती त्या 'शरीरबद्ध जीवात्म्यावर', जन्मजन्मांतरीच्या वैश्विक मार्ग गमनातीतील घोषित अंतिम श्रेष्ठ उद्देशांपर्यंत पसरलेली आहे. जा जीवन उद्देश योगी अरविंद म्हणतात तसा 'Divine Life किंवा 'सज्जनांची मंदियाळी' ह्या ज्ञानेश्वरी पसायदानसारखा, किंवा 'एकात्म मानव दर्शन' ह्या दैशिक शास्त्रावर आधारलेल्या परमपूज्य गोळवलकर गुरुजींनी शब्दांकन केलेल्या 'परिपूर्ण मानव' ह्या संकल्पनांशी, 'पराकाष्ठा' करणाराच आहे, हे लक्षात असू द्या!!

या संदर्भात आर्य धर्माचे मूळ पुरुष 'स्वामी दयानंद' ह्यांनी ज्या '१६ संस्कारविधीवर' संशोधित कर्मकांडांचे वर्णन केले ती यंत्रणासुद्धा 'दैशिक शास्त्राच्या' संकल्पनेशी जुळणारीच आहे हे नमूद करावेसे वाटते!!

मग, काय आहे 'वैदिक शास्त्रातील' संस्कार संकल्पना? 'स्वाती बिंदू' च्या संकल्पनेत जे मोती तयार होतात, तशा प्रकारच्या''वैश्विक गूढ कृती सारखी ही संस्कार क्रिया आहे.

सध्याच्या समाजात 'ह्या बौद्धिक संस्कार क्रियेविषयी पूर्ण अज्ञान आहे. एकांगी भौतिकवादाच्या प्रभावाने, या संस्काराची मर्यादा, ऐहिक व पृथ्वीवरील 'वस्तूंच्या' जीवनमर्यादे एवढीच व केवळ बौद्धिक व मानसिक उपचारांची यंत्रणा आहे. ('वस्तू' ह्याचा अर्थ जड कॉंशसनेस 'गृहीत धरला आहे) त्यामुळे 'मृत्यूनंतर' ह्या संकल्पनेतील मानव व संस्कार ह्यांचे काय होते, या बद्दलचा विचार, सद्यकाळातील विव्दानांना, वैज्ञानिकांना व अर्थातच राजकीय व सामाजिक नेत्यांना स्पर्शही करत नाही.

**दैशिक शास्त्र म्हणते –**

''आमच्या अधिजीविक शास्त्राप्रमाणे 'मनुष्य संस्कारमय असतो म्हणजे ज्याचे जसे संस्कार असतात तसा तो आपोआप बनतो.''

हे वाक्य सामान्य विश्वासाचे वा एखाद्या स्वप्नाळू आदर्शवादाचे नव्हे ह्याची खूषगांठ बांधा!! कारण, ह्या पृथ्वीवरच्या इतिहासांत अनेक 'संस्कार शाळा, विद्यालये, शिक्षण पद्धती ह्यांच्या मार्फत झालेल्या तथाकथित संस्कारित मानवांचे 'स्खलन' झालेले आपण पाहिले आहे व आजही त्याची भरपूर उदाहरणे आहेत. देशातील 'भ्रष्टाचाराच्या' प्रश्नावर जे रणकंदन चालले आहे, त्यावर उपाय कोणता? तर 'सशक्त लोकपाल' नेमावयाचा, पन त्याचे स्खलन किंवा पतन होणार नाही, ह्याची खात्री नाही. ह्या शंका आजही 'भ्रष्टाचार विरुद्ध' लढणाऱ्या नेतृत्वाला भंडावून सोडत आहेत!! कां बरे? कारण, ह्या संस्काराची 'पराकाष्ठा' ज्या जीवशास्त्रावर अवलंबून आहे त्यांतील 'आत्मसंस्कार' व त्रिगुणातीत अवस्थेतील आत्म्याच्या पाशाची ('शुन:शेप' प्रयत्नाची ऋग्वेदातील) साधी कथा माहिती सुद्धा त्यांना नाही. तसेच पृथ्वीवरील जन्म व मृत्यू ह्या क्रियांच्या ऐहिक मर्यादेबाहेरील वैश्विक जीवनमार्गाबद्दल पूर्ण अज्ञान, एव्हढेंच नव्हे, तर संपूर्ण अविश्वास व पूर्वग्रह आहेत!! भरपूर अडचणी व अज्ञान दिसत आहे. त्यातून मार्ग काढावयाचा आहे. पण, संस्काराची मूळ संकल्पना उपलब्ध 'दैशिक शास्त्रात' काय आहे ते पाहू या!!

दैविकशास्त्र म्हणते - 'संस्कार चार प्रकारचे असतात.

**संस्काराचे प्रकार**

१) जन्मांतर - एक शरीर मृत झाल्यावर दुसऱ्या शरीरात प्रवेश संस्कारसहित.

२) सहज - तन्मात्रिक शरीरास, विन्दवस्था व गर्भावस्थेत होणारे.

३) कृत्रिम - जन्मानंतर बाह्याभ्यतरिक संनिकर्ष व दीर्घाभ्यास मुळे

४) अन्वयागत - पितृवंश व मातृवंश पूर्वजाचे वारसा रुपाने मिळतात.

**अन्वयागत संस्काराचे दाय (वारशाचे) तीन प्रकार**

१) १४ पिढ्यापर्यंत पितृवंशी.

२) ५ पिढ्यापर्यत मातृवंशी

३) दूरस्थ पेक्षा जवळच्या पूर्वजांचे आधारावर आधिजननिक शास्त्राच्या वा सिद्धांताच्या आधारावर अधिकजननिक शास्त्रात खालील मुख्य गोष्टी मानल्या आहेत.

१) वंशात परंपरागत संस्कार उच्च असणे.

२) दंपतीचे जाति व वर्ण एक असणे, पण गोत्र व पिंड भिन्न असणे

३) दंपतीच्या गुणांत साम्य

४) पित्याचे ब्रह्मचर्य आणि मातेचे पतिदैवत्व (स्त्रीमध्ये संकल्पशक्ति ही बिंदूत (पुरुष) ज्या कोटीचे तेज असेल त्या क्षमतेची असावी लागते)

५) संतानोत्पादन केवळ पूर्ण तारुण्यातच होणे

६) गर्भाधान संस्कार

७) दोहद पूरण - डोहाळे पुरवणे

८) पुसंवन

९) अनवलोभन

१०) सीमन्तोन्नयन

११) गर्भभृति

गर्भ प्रगट होण्याच्यापूर्वी दूसऱ्या किंवा तिसऱ्या महिन्यात पुसंवन, चवथ्या महीन्यात अनवलोभन, सहाव्या किंवा सातव्या महिन्यात सीम तो नयन, हे संस्कार आणि सर्व महिन्यात गर्भभृति सांगितली आहे, गर्भभृतीच्या औषधींनी गर्भस्थ जीवाचे सर्व प्रकारचे संनिकर्ष श्रेष्ठ बनविले जातात.

१२) जातकर्म : नाळच्छेदन हे कांही औषधे व संस्कार क्रिया ह्यांच्या मदतीने हृदय व शरीरावर सुपरिणाम.

१३) शैशव संस्कार

मला कल्पना आहे की आधुनिक काळातही 'ॲलोपथी' सारख्या पाश्चात्य संस्कृतीवर आधारलेल्या वैद्य शास्त्रातही ह्या वर्णनातील कांही संकल्पना योजलेल्या आढळतील

पण, येथे दोन प्रश्न उद्‌भवतात ते म्हणजे राज्यकर्ते एखाद्या सामाजिक उन्नतीच्या उद्दिष्टांसाठी हे ज्ञान राबवतात कीं त्या ज्ञानाची वर्गवारी इतर औद्योगिक इंडस्ट्रीसारखी नफा, फायदा ह्याच तत्वांचा उद्‌घोष करण्यात धन्यता मानतात. सार्वजनिक क्षेत्रात सुद्धा कांही उपाय व योजना येतात, पण त्यामधून राज्यकर्त्याची 'हेल्थ केअर' एव्हढीच दृष्टी लक्षात येईल समाजावर 'संस्कार' तेही 'शारिरीक व आत्मिक स्तरावर योजले जातात असे दिसणार नाही.

दूसरा,'संस्कार क्रियांची कोणती शास्त्रीय भुमिका आजचे राज्यकर्ते बाळगत आहेत. सर्वसाधारणपणे हा विषय भौतिक विज्ञानाचा नसून 'धर्मशास्त्राचा आहे. तिथे धर्म संकल्पनात गोंधळ आहे व अनेक वाद आहेत.

पण, 'वैदिक शास्त्र' हे आर्य समाजाच्या दैशिक शास्त्राच्या संदर्भात 'संस्कार क्रिया' ह्याचा दोन्ही स्तरावर विचार करताना दिसतात. मानव हा शरीरबद्ध आत्मा आहे असे जाणल्यावर त्याच्यावर शरीर व आत्मा या दोन्हीवर संयुक्त व समन्वयी संस्कार क्रिया आवश्यक ठरतात.

याहून मोठा फरक आहे तो हा की 'जीवात्मलयाचा' प्रवास हा पृथ्वीवरील वास्तव्याशी निगडीत असला, तरी त्याचे मृत्यू नंतरचे गमन अज्ञात व गूढ अशा विश्वातून व लोकातून होऊन पून्हा पृथ्वीवर पुनर्जन्म व गर्भातून प्रवेश व प्रसवण्यानंतर भूमीवर पाऊल टाकणे हा आहे. हा 'गतीक्रम' इतर धर्मांना मान्य नाही एव्हढेंच नव्हे तर त्याला कांही दूसरा पर्याय सुद्धा त्यांच्या धर्मात नाही व त्याची त्यांना 'लॉजिकल' (तर्कपद्धती) गरजही वाटत नाही.

हे मुद्दे बाजूला ठेवूनही माझ्यापुढे प्रत्यक्ष संस्कार क्रिया संदर्भात त्या क्रियेची यंत्रणा (Technology) कशी असेल याचे गूढ पडले होते.

ही संस्कारक्रिया एखादी कायम स्वरुपाची, गुणात्मक व शरीरामार्फत व ज्ञानेद्रियांमार्फत व तपस्या, योग वगैरे, ज्ञानक्रियांमार्फत जीवात्म्याला झाली तरच ती 'Spiritual Science' अध्यात्मशास्त्रात बसणारी संस्कारक्रिया ह्या नामाभिधानाला पात्र ठरेल, अशी माझी ठाम भूमिका आहे.

मला उपलब्ध झालेल्या '१६ संस्कारविधीत' जरी कर्मकांडी स्वरुप प्राप्त झाले असले तरी त्याने माझे पूर्ण समाधान होऊ शकले नाही.

कारण एक तर त्यामधील 'अग्नि' व इतर 'देवता' यांच्या आवाहनाचा व प्रत्यक्ष फल प्रसाराचा कार्यक्रम कुठेही स्पष्ट व कृतीशील क्रिया करण्याच्या क्षमतेचे ऋषीसुद्धा समाजात आढळले नाहीत. हिमालयात असतीलही व म्हणूनच हिमालयातीलच एका 'मास्टर' श्री १०८ सोंबारी महाराजाचे 'दैशिक शास्त्र' आकर्षून गेले!!

पण, तिथेही 'संशोधन प्रयत्नांचा' अभाव, किंवा निरूत्साह पाहिल्यावर मी माझ्या स्वतःच्या प्रयत्नावरच विसंबून राहिलो.

आश्चर्य म्हणजे 'संस्कार क्रियेत' जे 'संगतीकरण' किंवा 'Integration' अपेक्षित आहे, त्याचे गूढ भाषेतील वर्णन ज्ञानेश्वरीत सांपडते व त्याचे बीजस्वरूपी मूळ पुरुषसुत्तमात सांपडते. त्यातील ज्ञानेश्वरीतील वर्णन मुळातच उद्‌धृत करतो. कारण, त्याचा सामाजिक स्तरावर अर्थबोध होणे अत्यावश्यक आहे. संस्काराच्या क्रियेत माणसाच्या गुणप्रवृत्तीत मूलप्रवृत्तीत मूलगामी बदल व तोही

सात्विकतेकडे झुकणारा किंवा निराळ्या अर्थानी सत्व, रज, तम ह्या गुणप्रवृत्तीत साम्यावस्था चिरस्थायी स्वरूपात आणण्याची किमया करावी लागते. ही काही बाह्यांगातील कृती नव्हे तर अंतरगातील चित्त, बुद्धी, मन अहंकार या अंत:करण चतुष्ट्याशी संबधित क्रिया आहे. ह्या क्रियेला मदत करणारी सक्षम व सशक्त, 'आध्यात्मिक सामर्थ्याची शक्ति', म्हणजे 'कुंडलिनी' (भगवती, अंबिका आद्यशक्ति वगैरे नावांची) जी मुलाधारचक्राशी निद्रित असते.

मग तिच्या जागृतीनंतर काय घडते!

''नवब्दारांचिया चौचकी।
बाणूनि संयतीची आडवंकी
उघडली खिडकी। ककारांतींची

**ककारः**

गगनतत्वात एकरूप होण्यास्तव कुंडलिनीचा जेव्हा प्रचंड प्रमाणात वेग वाढलेला असतो, त्यावेळी ती 'कुंडलिनी' 'जालंधर बंध' उल्लंघून 'ककाराच्या' अंतिम टोकावर जाऊन तो भेदून थेट गगनतत्वाच्याही माथ्यावर येऊन मिरवू लागते ।।६-१०२।।

मग मध्यमामर्ध्यविवरें। तेणे कोरिवें दादरें।
ठाकिलें चवरें। ब्रह्मरंध्र ।।१२-५५।।

**योगीसंत ज्ञानेश्वर**

''तात्पर्य, श्री ज्ञानेश्वरांचा अभिप्राय असा की, तीव्र ध्यानावस्थेत गगनतत्व जेव्हा साधकाचे पुढे येऊन उभे राहाते तेव्हा त्याच्यापुढे अग्रेसर होण्याकरीता सूक्ष्म दृष्टीची स्थिरता टिकवून एक छिद्र दिसते त्यातूनच 'दृष्टिवृत्तीची' 'उड्डाण' न्यावी लागते. मग, कुंडलिनीच परमात्मा लिंगाशी 'वृत्तीचे ऐक्य' घडवून आणते - तीच खरी संस्कार क्रिया होय. त्यासच ज्ञानेश्वर ''दोहिसी होय झटे'' असे म्हणतात. (वृत्ती - वृ = निववडणे) (झडे = धडपड होते) कारण, ब्रह्मरंध्र या ज्ञानचक्राला ऐक्यावस्थेच्या वेळी प्रत्यक्षतः 'ऐक्यरूप अवस्था' होत असते.



तेव्हा, जर पाच भौतिक देहच विलीन होतात तर त्या देहातील आकाशतत्त्व वेगळे करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तेही समरसत्वात आलेले असते ।। ६-३०६ ।।

देहाच्या निमित्ताने परब्रह्माचे ठिकाणी जीवपद प्रवेशते (जीवब्रह्म ऐक्यस्थिती) असे एकत्व प्राप्त होते.''

मला कल्पना आहे कीं हे वर्णन दुर्बोध वाटेल. पण कुठल्याही भौतिक वस्तूमध्ये जेव्हां रासायनिक क्रिया किंवा इतर मूलगामी व स्थिर परिवर्तन घडते, त्या क्रिया जरी जड दृष्टी व जड बुद्धीला दिसत नसल्या, तरी ही क्रिया वरकरणी सरळ, साधी व सोपी दिसत असली, तरी, हा एक तऱ्हेचा 'कायाकल्प' असतो. दुधाचे, तूप-धृत होण्याची क्रिया ही सर्वसाधारणपणे सामान्य व रोजच्या व्यवहारातील असली, तरी ती कां व कशी होते व ती पुन्हा उलटी, परार्तित कां होत नाही-हे भौतिक विज्ञानालो समजले नाही. म्हणूनच अज्ञानाचे जेव्हा ज्ञानात स्थायी परिवर्तन होते त्या फलनिष्पत्तीला 'घृत ज्ञान' असे म्हणले जाते.

त्यामुळे, मानवाच्या मूळ गुण प्रवृत्तीतील सत्व, रज व तम वृत्तीतील बदल हा याही क्रियांपेक्षा वरील स्तरावरील बदल होय. मनुष्याच्या स्वभावातील बदल हा कुठल्याही

बाह्य साधनेने होऊ शकत नाही, उलट जर तो वरपांगी झालेला दिसला तरी तो पृष्ठभागावरील तरंगाएव्हाढाच खोल असतो व त्याचमुळे थोड्याशा मोहाने, प्रलोभनाने स्खलन होऊ शकतो.

मग, आपल्याला तर 'संस्कांराची क्रिया' जीवात्म्याच्या ठिकाणी व कालातीत, त्रिगूणातीत, अवस्थात्रयातीत व जन्मजन्मातरीच्या प्रवाहात टिकून रहाणारी वैश्विक सत्याच्या पातळीवर व स्तरावर अपेक्षित आहे.

ही 'संस्कारक्रिया' त्यामुळेच 'भौतिक स्तरावरची' तकलादू, ठिसूळ व स्खलनशील अशी नको आहे, वर मूलगामी व कायम, चिरंतन स्वरूपाची हवी आहे, ती केवळ अध्यात्मशास्त्राच्या यंत्रणेवरच हवी आहे, ती केवळ अध्यात्मशास्त्राच्या यंत्रणेवरच आधारून होऊ शकेल.

ज्या जीवनध्येयाचे जन्मजन्मांतरीच्या वाटचालीवरचे स्वरूप हे 'Transformations of consciousness' म्हणजे जीवात्म्याचे पुरुषोत्तमपदावरचे स्थित्यंतर वा परिवर्तन, परिपूर्णता हवे आहे, त्याची क्रिया ही सुद्धा त्याच सामर्थ्याची शक्ति व यंत्रणा वापरून होऊ शकेल हे साधे तर्कशास्त्र आहे.

श्रीमद् भगवतगीतेतील १८ अध्यायांच्या उपदेशात याच परिवर्तनाची व्याप्ति, शास्त्राधार, भगवान कृष्ण हे अर्जूनाला सांगत आहेत. हा 'अर्जून' हा प्रतीकात्मक कुठलाही पृथ्वीवर आलेला जीवात्मा आहे. त्याला उद्देशून व 'संबोधूनच ह्या '१६ संस्कारक्रिया' मंत्रशास्त्र, अग्नि व इतर देवता यांच्या जागृतीने, आवाहनाने व संस्कार यज्ञाने होतात यात शंका नाही!!

**एक संकेत**


वरील परिच्छेद मी २२ डिसेंबरला लिहीला. त्यानंतर आज टाईम्स ऑफ इंडियाच्या २३ डिसेंबरच्या आवृत्तीत मला 'Western view' ह्या मथळ्याखाली "The Speaking Tree" ह्या चौकटीत खालील विचार आढळले. हे मला हे सर्व 'संकेतदर्शी वाटले, कारण की 'Integrality' 'आध्यात्मिक एकात्मता' असे ज्याचे वर्णन करता येईल (त्या यंत्रणेच्या) त्याच्या शोधात होतो.

वेदिक शास्त्रात ही योगाक्रियेने व शक्ति जागृतीने मस्तिष्कात किंवा 'सहस्त्रार चक्रात' (यज्ञकुंड) एका 'संस्कार क्रियेचा' भाग म्हणून होते. हे निवेदन करत होतो. तेव्हां त्याला पूरक असा विचार पाश्चात्य संस्कृतीतील विचारवंत सुद्धा करतात, हे जाणणे व सांगणे आवश्यक वाटले. कारण East and west will never meet म्हणजे पूर्व पश्चिम कधीच एकत्र येणार नाहीत, अशी ढोबळ पण अशी ठाशीव समज सध्याच्या सामाजिक इतिहासात दृढ आहे असे दिसते.

मग हा विचार पहा :

"I am convinced that an important stage of Human thought will have been reached, when the physiological and the psychological, the objective and the subjective, are actually united, when the tormenting conflicts or contradictions between my conscionsness and my body will have been factually ressolved or discarded.

- Ivan Pavlov



**इव्हान पॉवलॉन्व**

**ह्याचे स्वैर भाषांतर :**

''माझी खात्री पटली आहे. की ज्यावेळी मानवी बुद्धीची पातळी एका विवाक्षित जाणीवेपर्यंत स्थिरावेल;

कीं ज्यावेळी, 'शारिरीक इंद्रिय विज्ञानशास्त्र' व मानवी मानसशास्त्र', वस्तुनिष्ठ व व्यक्तीनिष्ठ विचार संयुक्त होतील. त्यांच्यामध्ये पूर्णपणे एक वाक्यता येईल. आणि ज्यावेळी, छळवादी व वितंडवादी असा संघर्ष, माझ्या प्रत्यक्ष शरीरातील व आत्म्याच्या बाबतीतला वास्तववादी पद्धतीने व समाधानपूर्वक सुटेल किंवा तो पूर्णपणे त्यजला जाईल आणि टाकला जाईल!!''

–इव्हान पॉवलॉव

**मानवजातीची स्वप्न रंजित धडपड**

एक लक्षात घ्या कीं ह्या केवळ इच्छा किंवा प्रार्थना आहेत. अनेक संत महात्म्यांनी, तत्ववेत्यांनी, विचारावंतांनी, राज्यशास्त्र धुरीणांनी, समाजपरिवर्तनवादी सहृदय नेतृत्वांनी ह्या इच्छा वेळोवेळी व्यक्त केल्याआहेत, त्या इच्छा आकांक्षांच्या धूसर मार्गावर वाटचाल केली आहे, एव्हढेच नाही तर कार्य केले आहे, त्याग केला आहे, पण फळ मिळालेले नाही. मिळाल्याचा भास झाल्यास यी स्थिती फक्त काही काळच टिकली व नंतर पुन्हा ''हरी ॐ''.

असे कां?

याचे कारण हा ऐक्यभाव, हे संगतीकरण, हा समझोता कृत्रिम व बाह्यात्कारी होता. त्याचे 'स्पिर्राच्यूअल इंटिग्रेशन' किंवा 'आत्मैक्य झाले नव्हते.

कां असे कां?

प्रत्यक्ष संस्काराक्रियेचे अज्ञान

त्याचेही उघड कारण लक्षात यावयाला हवे की त्याची संस्कारक्रियेची कायम स्वरूपाची यंत्रणा अवगत नव्हती. व्यवहारात, समाजात रूढ स्थितीत नव्हती आणि त्या व्कीगत, सामाजिक, व्यष्टि, समष्टि नात्यात्मक आणि मानव निसर्ग नात्यावर आधारलेली, मानव व विश्व यंत्रणा–व्यक्त–अव्यक्त ह्यामधील शक्ति, ज्ञान, मानसिक स्त्रोतांचे शास्त्रीय ज्ञान अवगत नव्हते. अनेक त्रुटी दृष्टोत्पत्तीस येतील.

**बोलाचा भात व बोलाचीच कढी**

ह्या सगळ्या गोष्टीच्या अज्ञानात व अभावात कुठल्या संस्कार क्रिया आणि कुठले सामाजिक किंवा आत्मिक स्तरावरचे परिवर्तन. ''नुसता बोलाचा भात आणि बोलाचीच कढी.''!!

सगळ्या तत्वज्ञान, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, शरीरशास्त्र व भौतिक विज्ञानात ह्या ज्ञानाचा अभाव आहे.

**वैशिक शास्त्राची पुनर्स्थापना**

ह्याचा अर्थ केवळ दैशिक शास्त्रांची काही पाने हाती आल्याने हा प्रश्न सुटला असा सुस्कारा टाकता येणार नाही. ह्या शास्त्रांची पुनर्उभारणी आवश्यक आहे. त्यावर संशोधन व तपस्या आवश्यक आहे. ह्या ज्ञानावर आधारलेली राज्ययंत्रणा व समाजसाधारणा व संस्था पुन्हा आपल्या सशक्तपायावर उभ्या रहावयास हव्या.

एव्हढी जाणीव व धारणा आज झाली तर या लेखाचा उपद्व्याप कारणी लागला असे वाटू शकेल.

ह्या ज्ञानाला पूरक असे पुढील विचार दिशाच्या पुढल्या अंकात करू या!!

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाईल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

# भक्तीचे प्रकार

*भक्तीचे अनेक प्रकार असले तरी आपल्याला संस्कृतीत 'नवविधा भक्ती' प्रचलित आहे. त्यांपैकी तीनप्रकारांविषयीचा हा लेख - संपादक*

भक्तीचे अनेक प्रकार आहेत. परंतु यांपैकी मुख्य प्रकार तीन आहेत. ते तीन प्रकार पुढीलप्रमाने आहेत.

**१) श्रवण भक्ती :**

'परमेश्वराचे नाव, यश, महत्व, त्यांचे गुण श्रद्धापूर्वक ऐकणे किंवा इतरांना ऐकवणे म्हणजेच श्रवण भक्ती होय.' परमेश्वराचे नाव सदा मुखी असावे आणि कानावरही त्याची लीलाच ऐकायला पाहिजे. परमेश्वराच्या नामाचे, त्याचबरोबर त्याच्या लीलांचे नेहमी श्रवण केल्याने भक्तांच्या ह्रदयातील पाप नष्ट होऊ लागते. परमेश्वराच्या नामाने किंवा त्यांच्या लीलाने जर भक्तांच्या ह्रदयातील पापे नष्ट होत असतील; तर नेहमी कानावर परमेश्वराचे नाव ऐकू येईल असाच आपला सहवास असायला हवा. त्यासाठी आपली संगत चांगली असायला हवी. आपल्यापेक्षा हुशार आसणाऱ्या व्यक्तींची नेहमी संगत धरावी. नेहमी साधू, संत, सद्‌गुरू यांची प्रवचने ऐकायला हवीत. उठता - बसता झोपताना सदा सर्वकाळ आपल्या कानावर परमेश्वराचे नाव ऐकण्यास येईल, असे वातावरण असावे. आपल्या घरातील सीडी/डीव्हीडी वर नेहमी भक्तिगीते हलक्या आवाजात लावून ठेवावीत. असे केल्याने भगवंताचे नाव सदा कानी पडते आणि घरातील वातावरणही प्रसन्न रहाण्यास मदत होते. श्रवणभक्तीसाठी आपल्या मनात परमेश्वरासबंधी दृढ श्रद्धा ठेऊन आळस न करता भक्तीमार्गाने चालत राहिले तरच आपणांस फळ मिळू शकते. त्यासाठी श्रवण भक्तीमध्ये चिंतन आणि मनन यांची सांगड घालावी लागते. संत कबीर निरक्षर होते. त्यांना लिहिता- वाचता येत नव्हते. त्यांनी उभ्या आयुष्यात हातात केव्हा पेन आणि कागद ही धरला नाही. तरीही त्यांच्याकडे एवढे ज्ञान आले कोठून? संत कबीर ज्या ठिकाणी रहात होते त्या ठिकाणी अनेक संत, विज्ञान, योगी, पंडित यांचेही वास्तव्य होते. त्यांची प्रवचने ऐकूनच त्यांनी हे ज्ञान प्राप्त केले होते. संतांच्या आणि योगींच्या संगतीत राहून त्यांनी ज्ञान मिळवले होते. म्हणून, परमेश्वराची भक्ती करायची असेल तर शिक्षित असणे गरजेचे नाही. विव्दानांचे विचार ऐकूनही भक्ती घडत असते.

**२) कीर्तन भक्ती :**

'परमेश्वराचे नाम, त्याचे गुण, त्याची लीला मुखातून स्वराने गाणे म्हणजेच किर्तन भक्ती होय. कीर्तनात एवढी क्षमता असते की, साक्षात परमेश्वराला ती वश करू शकते. आपण जे परमेश्वराचे नामस्मरण करतो त्यामध्ये फक्त आपलाच उद्धार होतो. पण कीर्तनाने अनेक व्यक्ती शुद्ध होतात, अनेक व्यक्तींचा उद्धार होत असतो. कारण कीर्तनामध्ये प्रत्यक्ष पांडुरंगच आपल्या समोर नाचत आसतो. त्यांच्या मुखातून शब्दाच्या माध्यमातून फुलांचा वर्षाव श्रोत्यावर होत असतो. त्यांच्या पवित्र वाणीने श्रोत्याना पवित्र करीत असतो. कीर्तन ऐकणे नव्हे तर आपल्या मुखातूनही सुरांच्या द्वारे परमेश्वराचे गुण गायले पाहिजेत. जसा आपला सूर असेल तसा त्याचा वापर करा. इतर लोक तुमच्या स्वराला हसतील याची भीती मनात बाळगू नका. जसे येईल तसे गा. ठरावीक साच्यामध्ये किंवा ठरावीक सुरामध्ये गायलेले भजन परमेश्वराला आवडत नाही. पण तुमच्या बोबड्या बोलीतील बेताल असलेले भजन ऐकायला नक्कीच परमेश्वराला आवडेल. म्हणून

कोणाचीही पर्वा न करता परमेश्वराचे गुणगाण गायले पाहिजे.

कीर्तन पैसे घेऊन करू नये. असे करणे हे पापच असते. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, आजचे साधू, संत, सद्गुरु लाखो रुपये घेऊनच प्रवचन ऐकवतात. त्याचबरोबर मोठमोठ्याने कीर्तन करायचे, प्रभूचे गुण गायचे पण मनात मात्र भाव नसायचा हे पापच आसते, प्रभूचे गुण गातांना मनापासून शुद्ध भावनेतून गायले पाहिजे. शुद्ध भावाशिवाय कोणतीही भक्ती फळाला येत नाही.

**३) स्मरण भक्ती :**

परमेश्वराचे नाव, गुण, चरित्र हे सर्व ध्यानात घेऊन स्मरण करणे याला स्मरण भक्ती असे म्हणतात. संत तुकाराम एके ठिकाणी म्हणतात 'जो वाचेने नाम उच्चारत नाही तो दोन बापांचा पुत्र आहे. त्याच्या सहवासात न रहाणे चांगले. जो जिभेने हरिनाम घेत नाही त्याचे तोंड चांभाराच्या कुंडाप्रमाणे आहे. (तु. गाथा. २९८२). म्हणून आपण भगवंताचे नित्य स्मरण करावे. आपले मन क्षणभरही भगवंतापासून दूर जाऊ देऊ नये. आपणास भगवंताची आठवण फक्त संकटात येत असते. एखाद्या सुखद प्रसंगी किंवा आनंदाच्या क्षणी लगेच त्याचा विसर पडत असतो. अशा संकटसमयी सुद्धा परमेश्वर त्याच्या मदतीला धाऊन येत नाही. म्हणून, सुखी आसो वा दु:खी नेहमी परमेश्वराचे स्मरण करायला हवे.

आपल्या दैनंदिन जीवनात आपण नेहमी पहात/ अनुभवत आसतो की, परमेश्वराने आपल्या उपयोगासाठी अनेक वस्तू निर्माण करून ठेवल्या आहेत. त्यांचा उपभोग मात्र आपण वेळोवेळी घेत असतो. पण या सर्वाचा निर्माता जो परमेश्वर आहे. त्याचे स्मरण मात्र आपण करत नाही. उदा. एखाद्या गृहीणीने सुंदर नथ सोनाराकडून करून आणली तर ती त्या सोनाराचे अनेक वेळा कौतुक करते. पण ती नथ घालण्यासाठी परमेश्वराने आपणास नाक दिले आहे. याचे स्मरण तिला नसते. जर त्या परमेश्वराने नाकच दिले नसते तर त्या नथीचा काय उपयोग? हे मात्र आपण विसरून जातो. परमेश्वराने एवढा सुंदर निसर्ग निर्माण केला आहे त्याचा उपभोग आपण घेतो पण त्या निसर्गाचा निर्माता परमेश्वर आहे याची मात्र आपण आठवण ठेवत नाही. कोणतीही वस्तू निर्माण करायची असेल तर तिला निर्माता लागतो. निर्मात्याशिवाय कोणतीही वस्तू नसते. तसेच या पृथ्वीचा निर्माता साक्षात परमेश्वर आहे याची मात्र आपण जाणीव ठेवत नाही, त्याचे स्मरण ठेवत नाही. परमेश्वराने आपणास सुंदर शरीर दिले म्हणून अभिमानाने मिरवत असतो. पण आपले शरीर कितीही सुंदर असले तरी भक्तीशिवाय ते कुरूपच असते.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३, सुभाष रोड,
कुंभारखान पाडा, डोंबिवली (प.), जि. ठाणे
भ्रमणध्वनी - ९९३०१४८४४६

●●●

## दिशा २०११

**२०११ मधील जानेवारी ते डिसेंबर मधील साहित्याची सूची दिशाचे हितचिंतक श्री. सचिन गराटे यांनी अतिशय मेहनतीने बनवली.**

**गेली ५-६ वर्षे ते दिशाची वार्षिक सूची देत आहेत. त्यांचे आभार! यंदाची सूची फेब्रुवारी १२ च्या अंकात येईल.**

**-संपादक**

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

'पूर्व प्राथमिक विभागात शुक्रवार दि. २९/१०/२०११ रोजी 'दिवाळी' हा सण साजरा करण्यात आला. विद्यालंकार सभागृहात छान किल्ला केला होता. त्यावर शिवाजी महाराज, विविध मावळे, श्री रामदास स्वामी ह्यांची मांडणी केली होती. किल्ल्याच्या बाजूने रांगोळी, पणत्या व छोटे कंदील लावून सजावट केली होती.

आवाजविरहित फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. सनईच्या सुरात पंगत बसवून, रांगोळीची सजावट करून मुलांना दिवाळी फराळ देण्यात आला. नंतर आपापल्या वर्गात नेऊन मुख्याध्यापिका वैद्यबाई यांनी मुलांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही शाळेच्या पटांगणात लहान व मोठ्या शिशुच्या - चेंडूने नेम धरून मारणे, रंग ओळखून ठोकळे गोळा करणे, हत्तीची चाल, बेडुकउड्या इ. विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

श्री समर्थ सेवक मंडळाच्या स्त्री कल्याण संघेटनेतर्फे घेण्यात आलेल्या साभिनय गीत स्पर्धेत लहान शिशुच्या १) आदिती यादव २) सुजल घडशी ह्या दोन विद्यार्थ्यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. तर मोठ्या शिशुच्या नियती देशमुख हिला साभिनय गोष्टीचे पारितोषिक मिळाले.

ब्राह्मण सेवा संघातर्फे घेण्यात आलेल्या धार्मिक पाठांतर स्पर्धेत विद्यार्थ्यांना अनुक्रमे प्रथम व पाचव्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

कला चिल्ड्रेन ॲकॅडमीतर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेत ११ मुलांना व हस्ताक्षर स्पर्धेत ४ मुलांना प्रशस्तिपत्रक व सुवर्णपदक मिळाली. मुख्याध्यापिका वैद्यबाई यांना 'उत्तम कार्यरत मुख्याध्यापिका' ॲवॉर्ड मिळाला.

**स्नेहसंमेलन**

पूर्व प्राथमिक विभागाचे मंगळवार दि. १३/१२/२०११ रोजी स्नेहसंमेलन झाले. मुख्याध्यापिका वैद्यबाईंनी सर्व शिक्षिकांना **'निसर्ग'** हा विषय दिला होता. मुख्याध्यापिका वैद्यबाईंनी आपल्या प्रास्ताविकातून तुकाराम महाराजांची सुंदर गोष्ट सांगून - कोणतीही गोष्ट करताना प्रथम ती स्वत: आचरणात आणण्याचा संदेश सर्व पालकांना दिला.

**१) हिरवा निसर्ग हा भवतीने..**
**२) काळ्या मातीत मातीत...**

इ. विविध निसर्गाच्या गाण्यांवर शिक्षकांनी नाच बसवले होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बाल कलाकार स्वानंद राजे व धवल राजे यांना बोलावले होते. धवल हा इ. ४ थी मध्ये पाटके विद्यालय डोंबिवली येथील शाळेत शिकत आहे तर स्वानंद हा इ. ८वी मध्ये त्याच शाळेत शिकत आहे. हे दोघेही शाळेत शिकत असूनसुद्धा संगीतातील राजे झालेले आहेत. धवल हा उत्तम तबलावादक असून त्याला मोठेपणी नीलेश परब सारखे ढोलकी वादक व्हायचे आहे. तर स्वानंद हा उत्तम गायक असून त्याला I.A.S. Officer व्हायचे आहे.

स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष माननीय श्री. करंदीकर साहेब यांनी मुलांना उत्तम मार्गदर्शन केले तसेच सर्व मुलांचे कौतुकही केले.

सर्व नाच खूपच सुंदर झाले. सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी ह्यांनी खूपच मेहनत घेतलेली दिसत होती.

सर्वात शेवटी लहान शिशुच्या कु श्रावणी नितीन पवार हिने **'पसायदान'** म्हणून कार्यक्रमाची सांगता केली.

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर प्राथमिक विभाग

लायनेस क्लब तर्फे शिक्षक दिनानिमित्त सहशिक्षिका सौ. स्नेहल नंदकिशोर कुडव यांचा 'आदर्श शिक्षिका' म्हणून सन्मान करण्यात आला.

### गणेशोत्सव

प्रतिवर्षाप्रमाणे आमच्या विद्यामंदिरामध्ये दि. १ सप्टेंबर रोजी श्री. गणेश चतुर्थीच्या दिवशी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत श्री गणेशाचे यशाशक्ती यथामती पूजन करण्यात आले. दोन्ही दिवशी सकाळ संध्याकाळ टाळांच्या गजरात उत्साहाने आरत्या करण्यात आल्या. मुख्याध्यापिका सौ. भंडारे बाईंनी श्रींच्या मूर्तीचे पूजन केले. दि. २ सप्टेंबर रोजी बँड व लेझीमच्या तालावर वाजत गाजत मासुंदा तलावात जड अंतकरणाने श्री गणेशाला निरोप देण्यात आला. गणेशोत्सवानिमित्त इ. १ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांची चित्रकला व लेखनस्पर्धा घेण्यात आली.

### शारदोत्सव

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. २८ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर या कालावधीत घटस्थापनेपासून ते विजयादशमी पर्यंत श्रीसरस्वती देवीचा शारदोत्सव शाळेत मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सजवलेल्या मखरात श्री सरस्वतीची स्थापना करुन मुख्याध्यापिका सौ. भंडारे बाईंनी देवीची यथासांग पूजा केली. सकाळ व दुपार अधिवेशनातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी नऊ दिवस उत्साहाने देवीचे पूजन केले व आरत्या म्हटल्या. त्याच नऊ दिवसात भोंडल्याचा उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांना खिरापत देण्यात आली. विजयादशमीच्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी पाटीपूजन केले. व त्यांना प्रसाद देण्यात आला. शारदोत्सवात विद्यार्थ्यांना आंतरशालेय विविध गुणदर्शन स्पर्धा घेण्यात आल्या.

### माहिती पट :

भूकंप व ज्वालामुखी - बुधवार दि. २३/११/२०११ या दिवशी विद्यार्थ्यांना भूकंप व ज्वालामुखी हा माहिती पट दाखविण्यात आला. जयंत नारळीकर यांच्या अनुमानानुसार भूकंप व ज्वालामुखी ही आपल्या देशावरील नैसर्गिक आपत्ती आहे. भूकंप कशाप्रकारे होतात, दरडी कशा कोसळतात, तसेच खगोलशास्त्रज्ञांनी लावलेले शोध याविषयीची माहिती विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. ज्वालामुखी होताना खडकाचे विभाजन कसे होते व लाव्हा रस बाहेर कसा पडतो. तसेच ज्वालामुखीमुळे जमीन सुपीक बनते. हिमालय पर्वत कसा तयार होतो. याचे प्रत्यक्ष दर्शन या माहिती पटात दाखविण्यात आले. आपल्या भूमीवर असलेल्या पाण्यातील वेगवेगळे मासे विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

### स्नेहसंमेलन

डिसेंबर - सालाबादप्रमाणे सन २०११ - २०१२ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ सोमवार दि. १२/१२/२०११ रोजी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या सौ. वैशाली राजे उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना शाळेविषयी गोडी कशी निर्माण होईल याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. व सुंदर कविता म्हणून दाखविल्या. मंडळाचे जेष्ठ सभासद श्री. करंदीकर साहेब यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास व अभ्यासाचे महत्त्व समजावून सांगितले. 'उत्सव नात्यांचा' या विषयावर बहारदार असे नृत्याविष्कार विद्यार्थ्यांनी सादर केले.

**कार्यशाळा :**

सर्व शिक्षा मोहिमेअंतर्गत सन २०११ - २०१२ या वर्षात दि. १४/१२/२०११ रोजी शैक्षणिक साहित्य कार्यशाळा आयोजित केली. या कार्यशाळेत पालक व विद्यार्थी यांनी शिक्षकांनी दिलेल्या घटकानुसार तक्ते, अंककार्ड, वाचनकार्ड, घडीचित्रे, कवितालेखन इ. अनेक प्रकारचे साहित्य तयार करण्यासाठी पालक - विद्यार्थी मोठ्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कला चिल्ड्रन अकॅडमी तर्फे आयोजित 'आदर्श शिक्षक पुरस्कार' दि. ३० डिसेंबर रोजी आपल्या शाळेतील सौ. सुमन केरुचंद कटके व सौ. चित्ररेखा प्रताप भांगरे यांना सन्मानित करण्यात आला. प्रमाणपत्र व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. आमच्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विजया भंडारे यांना कृतिशील मुख्याध्यापिका म्हणून मानचिन्ह देण्यात आले. तसेच कृतीशील शाळा म्हणून मानचिन्ह देण्यात आले. या स्पर्धेसाठी इ. १ ली ते ४ थी च्या ४०० ते ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**शैक्षणिक सहल**

आमच्या शाळेची इ. १ली ते ३ री शैक्षणिक सहल एस्सेल वर्ल्ड येथे व इ. ४ थी ची सहल नेहरु तारांगण येथे. नेहरु सायन सेंटर, नेहरु फ्लॅनेटोरियम म्युझियम हे पाहून विद्यार्थ्यांनी विविद माहिती मिळविली व सहलीचा मनमुराद आनंद लुटला.

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर माध्यमिक (विभाग)**

नोव्हेंबर ११

१) लायनेस क्लब उपवन, ठाणे आयोजित शिक्षक गौरव समारंभात आपल्या शाळेतील सौ. संध्या दिगंबर झंझाड बाई यांना 'आदर्श शिक्षक' व कु. त्रिशला प्रवीण कुमार (१० अ) हिला सर्वगुण संपन्न विद्यार्थी म्हणून गौरविण्यात आले.

२) नेहरू सायन्स सेंटर आयोजित आंतरशालेय मराठी विज्ञान प्रश्न मंजूषा स्पर्धेत दि. २४/११/११ ला झालेल्या अंतिम फेरीत आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना गटाने तिसऱ्या क्रमांकाचे रु. ४०००/- चे बक्षिस प्राप्त केले.

विद्यार्थ्यांची नावे

१) ऋषिकेश पांडुरंग शिंदे

२) प्रणिता हनुमंत काळभोर

३) अंकुर राजेंद्र पांचाळ

४) तनय विनायक जोशी

मार्गदर्शक शिक्षक म्हणून श्री. शेलवले यांनी काम केले

३) महात्मा गांधी मिशन तर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय म. गांधी सामान्यज्ञान परीक्षेत आपल्या शाळेतील कु. अंकुर राजेंद्र पांचाळ हा संपूर्ण राज्यातून प्रथम आला. व रु. ११००/- चे पहिले बक्षिस त्याला मिळाले.

**खेळ मांडला :**

नुकतीच सहामाही परीक्षा संपली म्हणजे पार पाडली अर्थातच शासनाने दिलेल्या आदेशानुसार व आमच्या आकलन क्षमतेच्या मर्यादेसह!

सुट्टीनंतर मुलांना उत्तरपत्रिका दाखविण्याचे ठरले. तसे केलेही. पण पूर्वी उत्तरपत्रिका वाटताना मुलांनी पेपर, बाकावर ठेवला आणि मुले गप्पांना लागली. कारण आठवीपर्यंत पासच होणार हे शासनाचे अभय. म्हणजे उत्तरपत्रिका पाहणे ही त्यांच्या - दृष्टीने केवळ औपचारिकता.

याउलट काही मुले ''बाई मी नापास झालोय माझी पुन्हा परीक्षा कधी होणार?'' अगदी सहज प्रश्न मी म्हणाले.''परवा घेते पण अभ्यास करून यायचा हं'' परवा मीच आठवणीने विचारलं तर त्याचे उत्तर ''बाई, विसरलोच''तरीही त्यांची, त्याच्या कलाने तो म्हणेल त्या प्रश्नांसहीत परीक्षा घेतली तरी साहेब नापास आणि कळस म्हणजे हसतमुख.

ही उदासीनता मुलांमध्ये पूर्वी नव्हती. एक दोन गुणांसाठी नापास झालेल्या मुलांना दोन दोन दिवस रडताना मी पाहिलयं आणि नापास झालोय, खूप अभ्यास करायला पाहिजे असं मनाशी ठरवून आमच्याकडून मार्गदर्शन घेवून पुढच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी पास झालेली मुलेही पाहिलीत. कुठे गेली ती चुरस? काळ बदलतोय. मान्य. पण हे बदल सकारात्मक आणि विधायकच असायला हवेत. शासनाला नेमकं काय साधायचयं?

आजची मुलं आमच्यासमोर न सोडवता येणारी कोडी बनली आहेत. आणि त्यांची पुनर्परीक्षा म्हणजे आमच्या संयमाची कसोटी. वेळोवेळी बदलणारी शैक्षणिक धोरणं, बदलणाऱ्या मूल्यमापन पद्धती, आम्हाला मिळालेली संदिग्ध व अपुरी प्रशिक्षणे, आमची संभ्रवावस्था, अशैक्षणिक कामे, यांचा परिपाक म्हणजे मुलांचे अभ्यासाकडे अक्षम्य दुर्लक्ष यावरून 'एक ना धड भाराभार चिंध्या' अशी शिक्षण यंत्रणेची अवस्था झालीय.

मुलांवर वारंवार, नवनवीन प्रयोग चाललेत. प्रकल्प तोंडी परीक्षा, विविध तंत्र यात मुलं भरकटलीत. पुढच्या इयत्तेत गेल्यावर मागील इयत्तेचे प्राथमिक ज्ञानही काहीना मिळवता येत नाहीए. अशातच आम्ही मुलांना शोधतोय आधिकाधीक उपसून गाळच हाती नको लागायला.

आणि भीती पुन्हा वेगळीच. शासन विद्यार्थी, पालक अभ्यासक्रम, नवीन मूल्यमापन पद्धती, नापास न होण्याचे अभय या सगळ्यांचा मध्य साधून, तारेवरची कसरत करून आम्ही मुलांना शिकवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतोय. पण तरीही वाटतयं ही संपूर्ण पिढीच दिशाहीन होतेय.

शासनाची धोरणं कदाचित खूप छान असतीलही. पण त्याची प्रभावी अंमलबजावणी ही तितकीच महत्त्वाची आहे. माझी ही व्यथा थोड्याफार फरकाने शिक्षकांचे प्रतिनिधित्व करणारी असावी.

शिक्षण क्षेत्र ज्या पद्धतीने ढवळून निघतयं त्यातून विद्यार्थ्यांचे भलं व्हावं हीच इच्छा. त्यामुळे निर्णय प्रक्रियेतील शिक्षण क्षेत्रातील सर्व दिग्गजांना सांगोवसे वाटते,

''सावरा रे''

**सौ. साधना योगेश कारंडे जोशी.**
सहा. शिक्षिका
डॉ. बेडेकर विद्या मंदिर माध्यमिक विभाग

## जोशी बेडेकर - कला - वाणिज्य महाविद्यालय

**Talent Academy**

''आन्तर्महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा (Youth Festival)" २०११ - १२ या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत महाविद्यालयाने भरपूर यश संपादित केले आहे. त्याचा सविस्तर अहवाल खालील प्रमाणे -

| | |
|---|---|
| रांगोळी आणि मेहन्दी (अश्विनी शर्मा ) | - द्वितीय क्रमांक |
| कोलाज (अजिंक्य तरलकर) | - प्रथम क्रमांक |
| रांगोळी (प्रवीण कदम) | - प्रथम क्रमांक |
| पाश्चात्य वाद्य (श्रेयस राजे) | - प्रथम क्रमांक |

वादविवाद स्पर्धा (मराठी) - प्रथम क्रमांक
(भाग्यश्री प्रधान, रूता वैती)

वादविवाद स्पर्धा (इंग्रजी) - प्रथम क्रमांक
(मधुमती बागची, संध्या धंजवल)

वक्तृत्त्व स्पर्धा (इंग्रजी) - प्रथम क्रमांक
(मधूमती बागची)

एकांकिका प्रयोग - प्रथम क्रमांक
(मानसी जावळे, सुप्रीम पठारे, श्रेयस राजे)

मूकाभिनय - प्रथम क्रमांक
(श्रेयस राजे, अक्षय देशपांडे, कल्पेश समेळ, सायली देशमुख. सुप्रीम पठारे, राहुल पूजारी)

**द्वितीय क्रमांक –**

भारतीय समूह गीत स्पर्धा - द्वितीय क्रमांक
(मयूर जोशी, निशाद ठाकर, अनिशा लोपसे, श्रद्धा यादव, प्राची फडनीस, क्षितीजा जोशी)

शास्त्रीय वादन - द्वितीय क्रमांक
(योगेश सूर्यवंशी )

नाटक (मराठी) - द्वितीय क्रमांक
(अक्षय हेगडे, सायली देशमुख, कल्पेश समेळ, तृप्ती गायकवाड, श्रेयस राजे, अक्षय देशमुख)

एकपात्री प्रयोग (मराठी) - द्वितीय क्रमांक
(श्रेयस राजे)

लोकनृत्य (समूहनृत्य) - द्वितीय क्रमांक
(करिष्मा गुप्ते, मिताली कांबळे, रोलीना, डी मेलो, चिन्मयी कोनहोलकर, रवि देशमुख, सिद्धान्त अतकरे, सुमीत कानेलकर, राहुल पुजारी, योगेश कुरडे, मोनिका हांडे)

– क्षितिजा जोशी

**''Youth Prize'' विजेते**

- उत्कृष्ट एकांकिका – ‘‘अलगद’’ – द्वितीय क्रमांक
- उत्कृष्ट कलाकार – श्रेयस राजे – प्रथम क्रमांक
- उत्कृष्ट मुकाभिनय – प्रथम क्रमांक
- मराठी नाटक – प्रथम क्रमांक

– तोलानी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या (एककलाकार) नृत्य स्पर्धेत ’सौरभ फरणे’ ह्याला द्वितीय क्रमांक प्राप्त झाले.

– वादन स्पर्धेत ‘योगेश सूर्यवंशी’ ह्याला ‘प्रथम क्रमांक प्राप्त झाले.

**"Ideal जल्लोष’’**

या स्पर्धेत Solo गायन स्पर्धेत मयूर जोशी ला ‘तृतीय क्रमांक’ (५०० रुपये) मिळाला.

मानसी जावळे ला स्वलिखित काव्यवाचन स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षिस मिळाला.

**NIFM विजेते + Ideal जल्लोष –**

Tele Games - सिद्धान्त आणि गट प्रथम क्रमांक
– केदार आणि समूह द्वितीय क्रमांक

Youth Festival Solo नृत्य (शास्त्रीय) पल्लवी लेले हिला उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.

– नकलाभिनय स्पर्धेत प्रशांत आणि समूहाला प्रथम क्रमांक

– व्यक्तिमत्त्व स्पर्धेत राधिका दबडगावकर हिला Most Popular Face आणि उत्कृष्ट नर्तिका , उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व यांसहित ‘द्वितीय क्रमांक’ प्राप्त झाले.

चाण्यक Institute of Management तर्फे आयोजित

Ad Mad Show. Dum Sheraj, Nail Art, Poster Painting, Stand up Comedy इत्यादी स्पर्धांमध्ये

सुगंधा कोल्हटकर, अक्षय हेगडे, सिद्धान्त अतकरे, विनीत देवाडीया, अवंती रावराणे, प्रशांत निगडे ह्यांना बक्षिस मिळाले.

NKT महाविद्यालयातर्फे आयोजित ''Mr. Rang Tarang" या स्पर्धेत विनित देवाडीया ह्याला प्रथम क्रमांक मिळाले.

Muranjan - Sydnem महाविद्यालय चर्चगेट तर्फे आयोजित विविध स्पर्धांत जोशी - बेडेकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भरघोस बक्षिसे प्राप्त झाली.

एकांकिका स्पर्धा 'उत्कृष्ट नाटक' ''अलगद'' प्रथम क्रमांक १५,००० रूपये रोख मिळाले.

Best Set - प्रथम क्रमांक

Best Light - प्रथम क्रमांक

Best Actor - प्रथम क्रमांक (श्रेयस राजे)

Best Director - प्रथम क्रमांक (अमोल भोर)

उत्कृष्ट महाविद्यालय (Cham Pionship trophy) जोशी बेडेकरला प्राप्त झाले.

- मूकाभिनय - प्रथम क्रमांक
- Junkstar - प्रथम क्रमांक
- छायाचित्रण स्पर्धा - तृतीय क्रमांक
- उत्कृष्ट नकलाकार - प्रथम क्रमांक

एस. एम. महाविद्यालयाने आयोजित केलेल्या स्पर्धेत जोशी बेडेकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भरघोस बक्षिस मिळालेत.

निबंध स्पर्धा (निशा कुरुप) - प्रथम क्रमांक

वादविवाद स्पर्धा (निशाकुरूप) - प्रथम क्रमांक

गायन स्पर्धा (क्रीस्टल सुलडाणा, अनिशा लोपेज) - प्रथम क्रमांक

सोलोगायन स्पर्धा - प्रथम क्रमांक

वृतान्त लेखन
**स्वाती भालेराव**

## नगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे

१) एम. एच. एस. आर. सी आणि न्यू विधी महाविद्यालय, माटुंगा, मुंबई यांनी दि. ९ डिसेंबर रोजी पूर्व लिंग तपासणी प्रतिबंधक कायदा या विषयावर शिक्षकांसाठी चर्चासत्राचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमासाठी प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार व प्राध्यापिका डॉ. सौ. स्वाती गाडगीळ यांनी भाग घेतला.

२) ठाणे जिल्हा बार असोसिएशनने दि. १७ डिसेंबर २०११ रोजी माननीय न्यायाधीश श्रीमती रंजना देसाई यांची सर्वोच्य न्यायालयाच्या न्यायाधीशपदी पदोन्नती झाल्यामुळे कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रमासाठी प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार उपस्थित होत्या.

३) विधी महाविद्यालयाच्या सहकार्याने विधी फाऊंडेशन ठाणे यांनी दि. १८ डिसेंबर रोजी कायदा विषयावर 'हेगडे व्याखान मालेचे' आयोजन केले होते. प्रांगणातील पंतजली सभागृहामध्ये सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र बार कौन्सिलचे अध्यक्ष श्री. अनिल सिंह हे कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ठाणे जिल्ह्याचे मुख्य न्यायाधीश श्री. सोनावणे आणि ठाणे जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष श्री. भोसले यांनी देखील आपले विचार मांडले. सदर कार्यक्रमामध्ये खालील विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

१) कौटुंबिक कलह कायदा - अँड श्री. कुंभकोणी

२) ग्राहक संरक्षण कायदा - अँड श्री. उदय वारुंजीकर

३) ट्रेडमार्क कायदा - अँड. श्री. सोनाळकर

४) २४ डिसेंबर रोजी लाला लजपतराय वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालय, महालक्ष्मी, मुंबई आणि यु. जी. सी. यांनी 'मानव अधिकार' या विषयावरील चर्चासत्रात 'Political Rights Education for Deepending Democracy in India' या विषयावर प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी प्रबंध सादर केला.

●●●

सुंदर दिसण्यापेक्षा ही सुंदर असणे खूप महत्त्वाचे. बहिरंगापेक्षा अंतरंगाची सुंदरता शाश्वत व खरी. अंतरंगातील सौंदर्य आपल्याला जीवनाकडे, व्यक्तीकडे, बघण्याची नितळ दृष्टी देते. प्रत्येक गोष्टीमधल्या उणिवा, दोष, शोधण्याची वाईट सवय आपण लावून घेतलेली असते. त्यामुळे सद्‌गुण, चांगुलपणा, याकडे आपोआपच दुर्लक्ष होते. अंतरंगाचा आरसा स्वच्छ. सुंदर झाला की जनात सारे सुंदरच दिसते. प्रत्येक व्यक्तीत परमेश्वराने काहीना काही उत्तमता, सुंदरता, दिलेली असतेच. आपण मात्र बाह्यरुपांवर मते बनवत असतो. म्हणून संत चोखामेळा म्हणतात -

उस डोंगा परी रस नव्हे डोंगा।
नदी डोंगा परी जल नव्हे डोंगे।।
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा।
काय भुललासी वरलिया रंगा।।

**विदुला वैद्य**
डॉ. बेडेकर विद्यामंदिर पूर्व प्राथमिक विभाग, ठाणे.

- आपण जिवंत राहण्यासाठी रक्ताचे अस्तित्त्व अत्यंत महत्त्वाचे असते; संपूर्ण जगभर रक्त हे भीतीचे, मृत्यूचे प्रतीक म्हणून ओळखले जाते.
- रक्ताची रचना अत्यंत गुंतागुंतीची असते. 'प्लाझ्मा' हा रक्ताचा मूलभूत घटक असतो आणि अन्य घन घटक त्यात तरंगत असतात. प्लाझ्मामध्ये ९१.५ टक्के पाणी संप्रेरके, शर्करा, क्षार, प्रथिने यांसारखे अन्य अनेक रासायनिक घटक असतात.
- रक्ताला त्याचा लाल रंग देणाऱ्या लाल रक्तपेशी श्वसनासाठी महत्त्वाच्या असतात. याच पेशींमुळे फुफ्फुसांतील प्राणौायू शरीरातील ३०० अब्ज पेशींपर्यंत वाहून नेला जातो. परतीच्या मार्गावर रक्त याच पेशीमधून कार्बन डाय ऑक्साईड गोळा करते.
- शरीराच्या ज्या भागात गरज असते त्या भागाकडे आवश्यकता असेल तेव्हा पांढऱ्या रक्तपेशी वाहून नेल्या जातात. शरीरात शिरलेल्या जीवाणूंसारख्या आगंतूक घटकांवर त्या हल्ला चढवितात. जंतूसंसर्ग झालेल्या ठिकाणी होणारा 'पू' म्हणजे मेलेल्या पांढऱ्या पेशी आणि जीवाणूच असतात.
- जखमा भरून काढण्याचे काम रक्तातील बिंबिंकाकडून केले जाते.
- पचन झालेले अन्न प्लझ्माद्वारे शरीराला ऊर्जा मिळावी यासाठी शरीरभर वाहून नेले जाते. त्याद्वारे कार्बोहायड्रेटस्, प्रथीने, मेद मिनरल्स, क्षार आणि जीवनसत्त्वे सर्वत्र पोचविली जातात. परतीच्या प्रवासात युरिया व युरिक ॲसीडसारखी टाकाऊ द्रव्ये प्लाझ्माकडून गोळा केली जातात आणि ती किडनीपर्यंत पोचविली जातात.

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्याना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्याची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वंतत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केल आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला २४० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्याचे मंडळाने ठरविले आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहन:**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षांचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

# स्वप्न साकारत आहे...



हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा –
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,

दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा

– डॉ. वा. ना. बेडेकर

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❉ *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
❉ *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
❉ *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*
*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

❉ **संपर्क** ❉

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे–४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.